

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026 RNI No. - MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २३ ऑक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बिहारमध्ये तेजस्वी यादव मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तर मुकेश सहानी हे उपमुख्यमंत्रिपदाचे उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३पटना**

विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना बिहारमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल या महाआघाडीतील विरोधी पक्षांमध्ये मतभेद उफाळून आले होते. जागावाटपाचा तिढा न सुटल्याने काही ठिकाणी महाआघाडीतील मित्रपक्षांनी एकमेकांविरोधात उमेदवार दिल्याचे प्रकारही घडले. दरम्यान, आता काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे विश्वासू असलेले ज्येष्ठ नेते अशोक गहलोत यांच्या पुढाकाराने बिहारमधील महाआघाडीतील तिढा सुटला आहे. आज



महाआघाडीच्या नेत्यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमधून तेजस्वी यादव यांची मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून, तर व्हीआयपी पक्षाच्या मुकेश सहानी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

महाआघाडीतील मतभेद मिटवण्यासाठी पाटण्यामध्ये पोहोचलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गहलोत यांनी मुख्यमंत्रिपद आणि उपमुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यांची घोषणा केली. सर्वांची मतं विचारात घेतल्यानंतर या विधानसभा निवडणुकीसाठी तेजस्वी यादव हे महाआघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार असतील. तर मुकेश सहानी हे उपमुख्यमंत्रिपदाचे उमेदवार असतील, असे अशोक गहलोत यांनी सांगितले.

मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून नाव घोषित झाल्यानंतर तेजस्वी यादव म्हणाले की, मी सन्माननीय लालूप्रसाद यादव, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि महाआघाडीतील सर्व नेत्यांचे आभार मानतो. तुम्ही माझ्यावर जो विश्वास दर्शवलाय, तो मी सार्थ ठरवेन.तत्पूर्वी महाआघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून मतभेद असल्याचं वृत्त समोर आलं होतं. त्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गहलोत यांनी पाटणा येथे धाव घेत लालूप्रसाद यादव, तेजस्वी यादव यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर महाआघाडी एकजूट असून, निवडणुकीसाठी सज्ज असल्याचे सांगितले.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर प्रतिबंध लादण्याचा प्रयत्न निंदनीय : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### स्थानिक स्वराज्य संस्थांवर महायुतीचा भगवा ध्वज फडकणार

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२३मुंबई**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर (आरएसएस) प्रतिबंध लादण्याचे प्रयत्न निंदनीय असल्याचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे सांगितले. काँग्रेसतर्फे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पाठविलेल्या पत्रातून 'आरएसएस'वर बंदी घालण्याची मागणी केली होती.



दिवाळीनिमित्ताने बुधवारी ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, संघाने नेहमीच मजबूत राष्ट्रवादी प्रतिष्ठा आणि सार्वजनिक सेवेतली बांधिलकी जोपासली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कट्टर देशभक्त आणि राष्ट्रवादी संघटन आहे. जेव्हा देश संकटात असतो, तेव्हा आरएसएस नेहमी मदतीसाठी पुढे येतो, असे शिंदे म्हणाले.

काही दिवसांपूर्वी कर्नाटकमध्ये सरकारने रस्त्यांवर पदयात्रा काढणे आणि सार्वजनिक स्थळे तसेच सरकारी परिसरात कार्यक्रम आयोजित करण्याच्या संदर्भात 'आरएसएस'वर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमावली तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तर प्रदेशमधील काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून 'आरएसएस'वर बंदी घालण्याची मागणी केली होती.

**स्थानिक स्वराज्य संस्थांवर महायुतीचा भगवा फडकणार**

महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत शिंदे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील महायुती ही निवडणूक जिंकेल. भाजपव्यतिरिक्त महायुतीमध्ये शिंदेसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सहकारी पक्ष आहे. त्यांनी पुढे सांगितले की, महायुतीने लोकसभा निवडणूक जिंकली आणि विधानसभा निवडणुकीतही मोठे बहुमत मिळविले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही महायुतीचा भगव्या ध्वज फडकेल.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मुंबई महापालिका वगळता इतर सर्व ठिकाणी महायुतीबाबत तीनही घटक पक्ष सकारात्मक असल्याचे चित्र दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले विरोधामुळे शक्तीपीठाचा मार्ग बदलणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

नागपूर ते गोवा या प्रस्तावित शक्तीपीठ मार्गाबाबत निर्माण झालेला वाद आणि विरोध लक्षात घेता राज्य सरकारने या मार्गाचे संरेखन बदलण्याचा निर्णय घेतला आहे. हा विरोध स्थानिक जनतेचा कमी आणि राजकीय नेत्यांचा अधिक आहे, असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

दिवाळी मिलनाच्या निमित्ताने नागपूर येथील रामगिरी या त्यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.

फडणवीस म्हणाले की, शक्तीपीठ प्रकल्प हा धार्मिक पर्यटन आणि राज्यातील संपर्क सुविधा वाढविणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. नागपूर ते गोवा हा मार्ग अनेक जिल्ह्यांमधून जाणार असल्याने पर्यटन, व्यापारी देवाणघेवाण आणि स्थानिक रोजगार निर्मितीसाठी तो लाभदायी ठरेल. मात्र, धाराशीव परिसरात काही ठिकाणी स्थानिक पातळीवर विरोध दिसून आला आहे. या विरोधाचा आदर ठेवत सरकारने मार्गात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्यांनी पुढे सांगितले की, विरोध प्रामुख्याने धाराशिव परिसरापुरता मर्यादित आहे. काही राजकीय नेत्यांनी या विषयाचा गैरसमज निर्माण करून आंदोलन रेटण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकार कोणावरही अन्याय करणार नाही. त्यामुळे शक्तीपीठ मार्गाचे नवे संरेखन सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांमधून नेण्यात येईल, ज्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचा शक्तीपीठाशी थेट संपर्क प्रस्थापित होईल.

चंदगड येथे एका आमदाराच्या नेतृत्वाखाली सुमारे ५०० शेतकऱ्यांनी मोर्चा काढून मार्ग त्यांच्या भागातून नेण्याची मागणी केली होती, याचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांचा हा उत्साह पाहून आम्ही त्या दिशेने मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला आहे. सरकार विकासकामांबाबत लोकांची मते ऐकते आणि योग्य ती सुधारणा करते.

प्रकल्पाला सुरुवातीला विरोध होणे ही नवीन गोष्ट नसल्याचे सांगत त्यांनी उदाहरण दिले, पुणे विमानतळासाठी जेव्हा भूसंपादन करण्यात आले, तेव्हा सुरुवातीला विरोध झाला होता. पण शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाल्यानंतर ९५ टक्के जमीन सहमतीने उपलब्ध झाली. फक्त पाच टक्के प्रकरणे कौटुंबिक कारणांमुळे अडकली.फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकार प्रत्येक प्रकल्पात पारदर्शकता ठेवेल. कोणीही बळजबरीने जमीन घेणार नाही. शेतकऱ्यांना योग्य मोबदला, पुनर्वसन आणि पर्याय देण्यात येतील. सरकारचा उद्देश विकास घडविणे आहे, मतभेद निर्माण करणे नाही.

शक्तीपीठ मार्गाच्या नव्या आराखड्यामुळे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या तिन्ही भागांमधील संपर्क अधिक सुकर होईल. या मार्गावर धार्मिक स्थळे, पर्यटन केंद्रे आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडले जाईल, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.

## महाजनांचा भुजबळ, करुणा मुंडेंना टोला : म्हणाले - काय जमाना आला गोपीनाथ मुंडेंचा वारस एक भ्रष्टाचारी अन् दुसरी नवऱ्याची अब्रु वेशीवर टांगणारी ठरवते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मुंबई**

आमदार धनंजय मुंडे हे गोपीनाथ मुंडेंचे राजकीय वारसदार असल्याचे वक्तव्य राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी बीडमध्ये झालेल्या ओबीसी एल्गार महासभेत केले होते. त्यांच्या या विधानावर आता प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. आम्ही समीर भुजबळ यांना वारसदार म्हटले तर चालेल का? असा टोला प्रकाश महाजन यांनी छगन भुजबळांना लगावला. तसेच पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडेंच्या खऱ्या वारसदार असल्याचे त्यांनी म्हटले.

छगन भुजबळ यांनी गोपिनाथ मुंडेंच्या वारसाबाबत विधान केल्यानंतर, धनंजय मुंडे



यांच्यावर टीका करणाऱ्या करुणा मुंडे शर्मा यांनी दीपावली पाडव्याच्या निमित्ताने त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. छगन भुजबळ १०० टक्के बोललेत. राजकारणात पोटचा नव्हे तर विचारांचा वारसा असतो. आज ते धनंजय मुंडे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. गोपीनाथ मुंडेंचे खरे वारसदार धनंजय मुंडेच असल्याचे करुणा मुंडेंच्या विधानानंतर आता प्रकाश महाजन यांनी फेसबुकवर पोस्ट करत, पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडेंच्या खऱ्या वारसदार आहेत, असे म्हटले आहे.

**प्रकाश महाजनांची पोस्ट काय?**


काय जमाना आला. स्वर्गीय मुंडे साहेबांचा वारस कोण ठरवत आहे, तर एक भ्रष्टाचारी, कारागृहात बरेच महिने काढून आलेला आणि दुसरी जी रोज उठून आपल्याच कुंकवाची अब्रू जगाच्या वेशीवर टांगते, अशा शब्दांत प्रकाश महाजन यांनी नाव न घेता धनंजय मुंडे आणि करुणा मुंडे यांच्या निशाणा साधला.

गोपीनाथ मुंडे यांचा वारसा पुढे नेण्याची क्षमता केवळ पंकजा मुंडे यांच्यातच आहे, असे प्रकाश महाजन यांनी ठामपणे मांडले आहे. स्वर्गीय मुंडे साहेब यांचा वारसा मग तो सामाजिक असो किंवा राजकीय असो, फक्त आणि फक्त माझी पंकू ताई, दुसरं कोणी नाही, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे.

**समीर भुजबळांना वारसदार म्हटल्यास चालेल का?**

यानंतर प्रकाश महाजन यांनी माध्यमांशी संवाद साधला असता, छगन भुजबळांवर टीका केली. आतापर्यंत पंकजा आणि धनंजय यांचे बरेच चाललेले आहे. ते बऱ्याच देखवत नाही का? अशी शंका आहे. पंकजा मुंडेंचा मामा आणि गोपिनाथरावा मेहुणा म्हणून मला असे वाटते की, छगन भुजबळांनी अशा पद्धतीने विधान करणे क्लेशदायक वाटते. उद्या छगन भुजबळांचे वारसदार समीर भुजबळ असल्याचे जाहीर केले, तर ते त्यांना चालेल का? असा सवाल प्रकाश महाजन यांनी उपस्थित केला.

## भारताने दुसऱ्या वनडेसह मालिकाही गमावली, शुभमन गिलवर नामुष्की, कांगारूच ठरले शेर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३ ॲडलेड**

शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारताल सलग दुसरा वनडे सामनाही गमवावा लागला आणि त्यांच्यावर मालिका पराभवाची नामुष्की ओढवली. भारतासाठी हा करो या मरो सामना होता. भारताने रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर यांच्या अर्धशतकांच्या जोरावर २६४ धावा केल्या होत्या, पण त्यानंतर भारताच्या गोलंदाजांना चांगली सुरुवात करुनही ऑस्ट्रेलियावर पकड मजबूत करता आली नाही. त्यामुळे दुसऱ्या वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला दोन विकेट्स राखत पराभूत केले आणि त्यामुळे त्यांनी मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

दुसऱ्या वनडे सामन्यात भारताची सुरुवात पुन्हा एकदा वाईट झाली. शुभमन गिल हा फक्त ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर विराट कोहलीला पुन्हा एकदा भोपळाही फोडता आला नाही. पण रोहित शर्मा या गोष्टी शांतपणे पाहत होता. रोहितने संयत सुरुवात केली खरी, पण सेट झाल्यावर रोहितने दमदार फटकेबाजी करायला सुरुवात केली. रोहित शर्माने यावेळी अर्धशतक झळकावले आणि संघाला सावरले. रोहित शर्माला यावेळी श्रेयस अय्यरची चांगली साथ मिळाली. रोहित आणि श्रेयस यांनी तिसऱ्या विकेटसाठी ११८ धावांची भागीदारी रचली.

रोहित शर्मा अर्धशतकानंतर शतकाच्या दिशेने कूच करत होता. त्यामुळे रोहित आता शतक झळकावणार, असे सर्वांना वाटत होते. पण मिचेल स्टार्कला मोठा फटका मारण्याच्या नादात रोहित शर्माने आपली विकेट गमावली. रोहित शर्माने यावेळी सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ७३ धावांची खेळी साकारली. रोहितनंतर सर्वांच्या आशा या श्रेयसवर होत्या. श्रेयसने आपले अर्धशतक झळकावले तर होते, पण त्यानंतर तो मोठी खेळी साकारू शकला नाही. श्रेयसला यावेळी सात चौकारांच्या जोरावर ६१ धावा केल्या.

श्रेयस बाद झाल्यावर केएल राहुल, वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी हे जास्त काळ खेळू शकले नाहीत. त्यामुळे भारताची वाईट अवस्था होत होती. पण यावेळी अक्षर पटेलने ४४ धावांची खेळी साकारल्यामुळे भारतााला २०० धावांचा पल्ला ओलांडता आला. त्यांतर हर्षित राणाने अखेरच्या षटकांत २४ आणि अर्शदीप सिंगने १३ धावा केल्या, त्यामुळेच भारताला २६४ धावा उभारत्या आल्या.

भारताच्या २६५ धावांचा पाठलाग करण्यासाठी ऑस्ट्रेलियात मैदानत उतरली, पण त्यांची सुरुवात चांगली झाली नाही. भारताने सुरुवातीला त्यांना धक्के दिले. पण त्यानंतर मॅथ्यू शॉर्टने ७८ धावांची खेळी साकारली आणि संघाला विजयाची दिशा दाखवली. हा सामना दोलायमान अवस्थेत होता. पण भारताच्या गोलंदांना अचूक गोलंदाजी करता आली नाही आणि त्यामुळे त्यांना हा सामना गमवावा लागला.

## रवींद्र धंगेकर यांची शिवसेनेतून हकालपट्टी होणार

### युतीसाठी शिंदे मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत, भाजप नेत्यांना टार्गेट करणे भोवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३पुणे**

पुण्यातील राजकारणाला नव्या वळणावर नेणारी एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यावर पक्षातून हकालपट्टीची कारवाई होण्याची शक्यता आहे. भाजप नेत्यांवर सातत्याने टीका करत धंगेकरांनी महायुतीत अंतर्गत तणाव निर्माण केल्याचा आरोप होत असून, त्यामुळेच धंगेकरांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा निर्णय झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

केंद्रिय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावरील कथित भ्रष्टाचाराचे आरोप, तसेच कात्रजमधील गोळीबार प्रकरणात भाजप नेत्यांना जबाबदार धरणे, या पार्श्वभूमीवर धंगेकरांनी केलेल्या वक्तव्यांमुळे भाजप नेते नाराज झाले होते. त्यामुळे पुण्यातील काही भाजप पदाधिकाऱ्यांनी



थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धंगेकरांविरोधात तक्रार दाखल केली. भाजप नेत्यांच्या तक्रारीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या चर्चेतून हा निर्णय झाल्याचे समजते.

**शिंदेंनी समज दिल्यानंतरही धंगेकर थांबले नाहीत**

सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदेंनी भाजपसोबतची युती टिकवून ठेवण्यासाठी धंगेकरांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातच शिंदेंनी धंगेकरांना महायुतीमध्ये वाद नको अशी जाहीरपणे समज दिली होती. मात्र, तरीही धंगेकरांनी भाजप नेत्यांवर टीका करणे थांबवले नाही. भाजपच्या अंतर्गत चर्चेनुसार, धंगेकर हे काँग्रेसकडून पाठवलेले 'हस्तक' असून, संजय राऊत त्यांना 'हँडल' करत असल्याचाही आरोप आहे.

## संपादकीय ......

# दिवाळी आणि दिवाळे

दिवाळी साजरी करणे आणि दिवाळे निघणे याचा शाब्दिक संबंध जरूर असावा. दिवाळी साजरी करताना सर्वसामान्य माणसाचे दिवाळे निघत असते. 'दिवाळी' या शब्दावरूनच 'दिवाळे' या शब्दाची व्युत्पत्ती झाली असावी. दिवाळीचा किराणा जवळपास दुप्पट भरावा लागतो. संमिश्र किराणा सामानामधून लाडू, करंज्या, अनारसे, चकल्या, चिरोटे, पुर्या इत्यादी पदार्थांची निर्मिती होत असते. या काळात मधुमेही मंडळीसुद्धा डॉक्टरी सल्ला झुगारून जिभेचे चोचले पुरवून घेत असतात. रक्तदाबाचा विकार असणारे कोलेस्ट्रॉलची काळजी करीत नाहीत. दिवाळीत सोडून दिलेले पथ्यपाणी दुरुस्त करण्यासाठी नंतर डॉक्टरांची आणि औषधांची बिले भरताना पुन्हा दिवाळे निघत असते. ठणठणीत प्रकृती असणार्यांचे काम खाणे आणि पचवणे आहे. या दोन गोष्टींवर भर देणारी मंडळी या चार दिवसांत पावसाळ्यात मोराला आनंद व्हावा, तशी आनंदी दिसतात.

सारे घर तृप्त, तर गृहिणी समाधानी हे संस्कृतीचे तत्त्व यांच्या सुखाचे रहस्य असते. नवनवीन चविष्ट पदार्थ करून घरातील सर्वांना सणाचा अनुभव देणे या ध्येयाने गृहिणीवर्ग कार्यरत असतो. पहाटे थंडीत पोरासोरांना आंघोळी करणे जीवावर येते. त्यात पुन्हा नरक चतुर्दशीला आंघोळीला उशीर झाला, तर नरक अंगावर पडतो, असे आदल्या दिवशी ज्येष्ठांनी सांगितलेले असते. दिव्यांनी ओवाळून अंगाला सुवासिक तेल लावून त्यावर उटण्याने खसाखसा अंग खरबरीत करून नंतर आंघोळ, असा स्वर्गीय अनुभव घेण्याची संधी असताना नरक पडण्याची रिस्क घेणार तरी कोण?

अशी आंघोळ चालू असताना अंगणात अचानक दाणदिशी फटाक्यांची लड लावणारा एखादा भाचा किंवा भाची असली, तर त्यासारखे सुख नाही. लाडक्या मामाच्या घरी जाऊन त्याच्याकडून काही ना काही उकळणारी भाचेमंडळी दिवाळीत फॉर्मात असतात. मामा आणि भाचा ही जोडी शकुनी–दुर्योधन, कंस–श्रीकृष्ण अशीच असते, असे काही नाही. तिचे प्रेमळ स्वरूप दिवाळीमध्ये पाहायला मिळते. भाचे किंवा भाच्या मोठ्या असतील, तर त्यांचे भारीचे कपडे मामाचे दिवाळे काढण्यात अग्रेसर असतात. काही प्रेमळ भाचे तर दिवाळीला निघण्यापूर्वीच 'मामा, तुला लुटण्यासाठी येतोय, अंगाला तेल लावून बसू नकोस' असे दरवर्षी न चुकता बजावीत असतात. अशा प्रेमळ भाच्यांमुळे दिवाळे निघत असले, तरी अशा दिवाळीचा आनंद काही औरच असतो, हे तुम्हालाही पटेल.

# नीरज चोप्रा बनला लेफ्टनंट कर्नल!

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुखांनी प्रदान केली उपाधी

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक–** दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अलंकरण समारंभात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते त्यांना ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. नीरज चोप्रा २६ ऑगस्ट २०१६ रोजी नायब सुभेदार या पदावर भारतीय सैन्यात भरती झाले होते. त्यानंतर, २०२१ मध्ये या खेळाडूला सुभेदार पदावर बढती मिळाली. तर २०२२ मध्ये निरजला सुभेदार मेजर पदावर बढती मिळाली होती.

नीरज हाऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारतासाठी दोन वैयक्तिक पदके जिंकणाऱ्या निवडक खेळाडूंमध्ये समाविष्ट आहेत. थलेटिक्समध्ये त्यांच्यापूर्वी नॉर्मन प्रिचर्ड यांनी दोन रौप्य पदके (पुरुषांची २०० मीटर आणि पुरुषांची २०० मीटर अडथळा शर्यत) जिंकली होती. कुस्तीमध्ये सुशील कुमारने एक रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये पीव्ही सिंधूने एक रौप्य आणि एक कांस्यपदक आपल्या नावावर केले आहे, तर नेमबाजीमध्ये मनू भाकरने दोन कांस्यपदके जिंकली आहेत. नीरजने भारतात भालाफेक खेळाला मिळवून दिली नवी ओळख टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून नीरजने इतिहास रचला होता. मात्र, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये त्याला



आपल्या सुवर्ण यशाची पुनरावृत्ती करता आली नाही. असे असले तरी निरजने भारतात भालाफेक या खेळाला नवी ओळख मिळवून दिली आहे. जागतिक थलेटिक्स चॅम्पियनशिपसह जगातील अनेक स्पर्धांमध्ये त्याने अव्वल स्थान मिळवले आहे. सध्या तो केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील अग्रगण्य भालाफेकपटूंमध्ये गणला जातो. परिणमे त्याच्या यशामुळेच भारतात या खेळाला लोकप्रियता मिळाली आहे.

### नीरजच्यापूर्वी 'या' खेळाडूंना मिळाला आहे सन्मान

भारतीय लष्कराने नीरज चोप्रा याला प्रादेशिक सेनेत 'लेफ्टनंट कर्नल' या पदाची मानद उपाधी दिली आहे. नीरज याच्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी आणि कपिल देव तसेच ऑलिम्पिक सुवर्ण पदक विजेता अभिनव बिंद्रा यांसारख्या खेळाडूंना प्रादेशिक सेनेत मानद उपाधी देण्यात आली आहे. प्रादेशिक सेना भारतीय लष्कराचे राखीव दल आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांचेबल्ले बल्ले

## आठवडाभर सुट्ट्यांचा मिळाला दिवाळी बोनस



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** दिवाळी म्हटलं की सर्वांनाच सुट्ट्या हव्या असतात. या दिवाळीत सरकारी कर्मचाऱ्यांची मात्र चांगलीच बल्ले बल्ले झाली. दोन–तीन दिवस नव्हे तर चक्क एक आठवडाभर त्यांना सुट्ट्या मिळाल्याने अधिकारी कर्मचाऱ्यांचीच दिवाळी झाली. शनिवारपासून (ता. १८ ऑक्टोबर) बंद असलेली सरकारी कार्यालये थेट सोमवारी (ता. २७ऑक्टोबर) उघडणार आहे. दिवाळी म्हटलं की सर्वांनाच सुट्ट्यांची आवश्यकता असते खरेदी आणि सणांचा आनंद साजरा करण्यासाठी जरी खाजगी कर्मचाऱ्यांना सुट्ट्या मिळत नसल्या तरी सरकारी कर्मचाऱ्यांना मात्र त्याचा आनंद घेता येतो. यावर्षी दोन ते तीन दिवस असणाऱ्या सुट्ट्या यावेळी तब्बल आठवडाभर मिळाल्याने सरकारी कर्मचाऱ्यांची बल्ले बल्ले झाली.

शनिवारी १८ ऑक्टोबर व रविवार १९ शासकीय सुटी होती. सोमवारपासून तीन दिवस पुन्हा सुट्ट्या होत्या. गुरुवार २३ ऑक्टोबर रोजी भाऊबीजमुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून घोषित सुटी असल्याने पुन्हा एक सुट्टी मिळाली. आठवड्यातील एक शुक्रवार (२४ ऑक्टोंबर) जर सोडला तर पुन्हा शनिवार रविवार शासकीय सुटी आल्याने सरकारी कार्यालय तब्बल एका आठवड्यानंतर म्हणजेच सोमवारी उघडतील. शुक्रवार २४ ऑक्टोंबरला शासकीय सुटी नसली तरी अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती ही नगण्य दिसणार. त्यामुळे या दिवाळीत अधिकारी कर्मचाऱ्यांना मात्र आठवडाभर सुट्टीचा आनंद मिळत आहे.

# रब्बी हंगामात ग्लॅडिओलसच्या 'या' टॉप ३ जातींची लागवड करा, चांगला नफा कमवा

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप पिकांची काढणीला सुरवात झाली आहे. दुसरीकडे रब्बी हंगामाची चाहूल लागली आहे. रब्बी हंगामात तुम्हाला जर फुल शेतीला प्राधान्य द्यायचे असेल तर ग्लॅडिओलस फुलांची शेती फायदेशीर ठरू शकते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर हा हंगाम या फुलांच्या जातींसाठी आदर्श मानला जातो. जाणून घेऊयात फुलाच्या विविध व्हरायटीबद्दल...

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

रब्बी हंगामात ग्लॅडिओलसची लागवड करून शेतकरी चांगला नफा कमवू शकतात. यामध्ये पुसा सिंदूरी, पुसा शांती आणि पुसा रजत या विविध जातींची लागवड केल्याने उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढू शकते.

**पुसा सिंदूरी–** पुसा सिंदूरी ही ग्लॅडिओलस फुलांची एक सुधारित जात आहे. सुरुवातीच्या जातींना ६०–६५ दिवसांत फुले येण्यास सुरुवात होते, तर मध्यम आणि उशिरा जातींना ८० ते ११० दिवसांत पिकते. दिल्ली–एनसीआर आणि उत्तरेकडील मैदानी भागातील शेतकरी याची लागवड करू शकतात. प्रति रोप अंदाजे ३.३३ कॉर्म्स तयार होतात आणि प्रति माता कॉर्म अंदाजे ६७–७७ रोपे तयार होतात. प्रति एकर ४० हजार ते १ लाख २५ हजार स्पाइक्सचे उत्पादन शक्य आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये** : लांब अणकुचीदार टोक (९८.७७ सेमी), ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात फुले असतात. कापलेली फुले पुष्पगुच्छ, फुलदाण्या आणि जपानी सजावट शैलींमध्ये वापरली जातात. या फुलांना मार्केटही चांगले आहे.

**पूसा रजत–** ग्लॅडिओलसची ही जात मोकळ्या शेतात, सौम्य हवामानात आणि चांगल्या सूर्यप्रकाशात, योग्य निचरा आणि चांगली पाणी धरून ठेवण्याची क्षमता असलेल्या वालुकामय जमिनीत लागवडीयोग्य आहे. तिच्या प्रत्येक काडीवर २० पेक्षा जास्त फुले, प्रत्येक रोपावर सरासरी ३.३३ रोपे आणि प्रत्येक रोपावर ६५–७० पेक्षा जास्त कोंब तयार करते.

**प्रमुख वैशिष्ट्ये** १०४ ते १०८ दिवसांत फुले येण्यास सुरुवात होते. फुले पांढरी असतात (एनएन १५५ बी).

उपयोग : विविध प्रसंगी आणि सजावटीसाठी योग्य.

**पुसा शांती–** पुसा शांती ही जात विशेषतः दिल्ली–एनसीआर आणि उत्तरेकडील मैदानी भागांसाठी योग्य आहे. लागवडीसाठी सौम्य हवामान आणि चांगला निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. प्रत्येक रोपावर अंदाजे ३.३३ कॉर्म आणि अंदाजे ६७.७७ कॉर्म तयार होतात.

**प्रमुख वैशिष्ट्ये** : रोपाची उंची अंदाजे १४४.६६ सेमी आहे.

काट्याची लांबी अंदाजे १२४.६६ सेमी आहे.

ही मध्यम कालावधीची जात आहे, जी अंदाजे १०५ दिवसांत फुलण्यास सुरुवात करते.

मजबूत रोपे आणि आकर्षक फुले बाजारात चांगली किंमत मिळवू शकतात.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## घसा का खवखवतो?

**दि.२३ विदर्भ प्रजसत्ताक**

घशात नेहमीच सूज राहत असेल, तर हे स्ट्रेप थ्रोटचे लक्षण असू शकते. घसादुखी ही अनेकांना सामान्य वाटते; परंतु घसा दुखणे, सूज येणे, जळजळ होणे हे सोअर थ्रोटच्या विषाणूंमुळे होऊ शकते. यास ग्रुप ए स्ट्रेप्टोकॉकस असेही म्हटले जाते. स्ट्रेप थ्रोट हा घशात आणि टॉन्सिलवर अधिक परिणाम करतो.



**स्ट्रेप थ्रोट कशामुळे होतो?**

स्ट्रेप थ्रोट हा एक संसर्गजन्य रोग आहे. तो बाधित व्यक्तीच्या संपर्कात आल्यास चांगल्या प्रकृतीच्या लोकांनादेखील होऊ शकतो. एखादा आजारी व्यक्ती आपल्यासमोर खोकत असेल किंवा शिंकत असेल, तर आपल्यालादेखील स्ट्रेप थ्रोटची समस्या होऊ शकते. स्ट्रेप थ्रोट आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी थ्रोट कल्चर टेस्ट केली जाते. अर्थात, काही लक्षणे पाहता डॉक्टरदेखील आपल्याला स्ट्रेप थ्रोट आहे की नाही, हे सांगतात. यात अँटिबायोटिक औषधी दिली जातात. यामुळे स्ट्रेप थ्रोटपासून आराम मिळेल.

**स्ट्रेप थ्रोटची लक्षणे**

स्वरयंत्रावर परिणाम, ताप, घशात खवखव, लिम्फ नोडस्वर सूज, घसादुखी, टॉन्सिलमध्ये सूज, दुखणे, भूक न लागणे, डोकेदुखी, उलटी आल्यासारखी वाटणे, तोंड येणे.

**स्ट्रेप थ्रोटचा धोका**

आपण वेळीच उपचार केले नाही, तर आपल्याला अनेक प्रकारचे साईड इफेक्ट होऊ शकतात. अनेक अवयवांवर परिणाम होऊ शकतो. किडनीवर सूज, रुमेटाईड फिवर, सांधेदुखी, सूज यासारखी लक्षणे दिसू शकतात.

**घरगुती उपचार** डॉक्टरनी सांगितलेल्या औषधांचे सेवन करण्याबरोबरच काही घरगुती उपचारदेखील करू शकता.गरम पाण्यात मीठ टाकून गुळण्या करणे, थंड खाद्यपदार्थापासून लांब राहणे, गरम सूप, चहा यासारखे लिक्विड डायट घेणे, मऊ गोष्टींचे सेवन करणे. गिळताना त्रास होणार नाही, अशा पदार्थांचे सेवन करणे, वाफ घेणे, सूज आणि दुखणे कमी होऊ शकते, आले पाण्यात टाकून उकळावे, कोमट पाण्याने गुळण्या करत प्राशन करणे.

# समृद्धी महामार्गावर टमाटरने भरलेल्या ट्रकला भीषण आग; सुदैवाने जीवितहानी टळली

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२३धा.रेल्वे** समृद्धी महामार्गावर टमाटर घेऊन जाणाऱ्या ट्रकला अचानक भीषण आग लागल्याची घटना चैनल नंबर १०६ जवळ घडली. या आगीत ट्रकचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने चालक व वाहक यांनी वेळेत उडी मारून जीव वाचवला. दोघेही किरकोळ जखमी झाले आहेत.आग लागल्याने ट्रक उलटला व त्यातील टमाटर रस्त्यावर पसरले. घटनेची माहिती मिळताच धामणगाव नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाचे फायरमन हेमंत कापसे व प्रशांत रोकडे, तसेच चालक सतीश उईके यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. त्यांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली.



# बीरव्याची मैफिल अन डफळी च्या निनादात रंगला ढाल महोत्सव, आ प्रतापदादा अडसड यांनी दिल्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२धामणगाव रेल्वे**

चका चका चांदणी यो गोवारियो बिनो गायनसे कोटा भरे घरघर देवो आशिष गा.अश्या बीरव्याची मैफिल अन डफळी च्या निनादात विदर्भातील साडे पाच हजार गावात आदिवासी गोवारीचा ढाल महोत्सव रंगला असून आ प्रतापदादा अडसड यांनी मतदार संघात साजऱ्या होणाऱ्या ढाल पूजन महोत्सवाला शुभेच्छा दिल्याआदिवासी गोवारी समाजाची संस्कृती म्हणजे ढाल पूजन उत्सव, आद्य धर्मगुरू पाहंदी पारी कुपार लींगो व माता जंगो रायताड यांच्या प्रतिकात आपल्या मृत पूर्वजांच्या रुपात दोन मुखी पुरुषाची व चार मुखी स्त्री च्या नावाची ढाल बनवून हिंदू धर्माच्या लक्ष्मी पूजेच्या दिवशी ही पूजा करण्यात आली आज पाड्व्यालाआदिवासी गोवारी जमातीच्या युवकांनी व वडीलधारी व्यक्तींनी पायाला गुंघरु बांधुन आपले पारंपारिक आकर्षक नृत्य सादर केले

इतिहासाची परंपरा जपतेय आदिवासी गोवारी जमातआद्य धर्मगुरू पाहंदी पारी कुपार लींगो व माता जंगो रायताड यांनी मिळून काट सावरी च्या झाडाखाली सगा सामाजिक व्यवस्था निर्माण करून कोया धर्माची स्थापना केली . व माता कली कंकली च्या मुलांना कोया धर्माची दीक्षा प्रधान केली होती. व जय सेवा चा मूलमंत्र नुसार समाजाची निस्वार्थ सेवाचा भाव मानत ठेऊन कार्य करावे. व समाज संरचना केली हाती. या मुळे समाजामध्ये एक नवी दिशा अर्पण केली. व सगा बिडार ( गोंदोला) परिवारात प्रेमभाव आणि एकमेकांच्या निस्वार्थ सेवा चा



भाव निर्माण झाला. आणि गोवारी (कोपाल ) ही जमात गोंदोला परिवाराचा एक अंग आहे. म्हणून आदिवासी गोवारी जमात ही काट सावरीच्याच झाडाखाली ढाल पूजा करून उभी करतात. यामुळे समाजात एक आंनदोउत्सव व शांतता नांदावी म्हणून ढालीच्या प्रतिकात जंगो आणि लिंगो यांच्या प्रतिकात आपल्या पूर्वजांच्या नावाने ढाल निर्माण करून पूजन व उत्सव सादरा केला जातो.कावली मध्ये दिवसभर हा उत्सव साजरा करण्यात आला यात आ प्रतापदादा अडसड धामणगाव मतदार संघात साजऱ्या होणाऱ्या उत्सवाला त्यानी शुभेछा दिल्या यावेळीआदिवासी गोवारी युवा शक्ती संघाचे राज्य संघटक मोहन राऊत , , गजानन गुरुभेले गणेश राऊत,मधुकर नेवारे सतीश नेवारे,विलास सोनवणे गजानन नेवारे निलेश नेवारे बाबाराव राऊत मुकीदा काळसर्फे, सुदाम ठाकरे अर्जुन सोनवणे नारायण सोनावणे अंकुश राऊत, नीलेश सहारे यांच्यासह समाजातील शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २३ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# तिवस्यात नागरिकांवर पोलिसांचा लाठीचार्ज

## गायी-म्हशीच्या परंपरागत खेळाला गालबोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ तिवसा** तिवसा शहरात जुन्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर अनेक वर्षापासून मकाजी बुवाची मूर्ती असून या ठिकाणी सालाबादाप्रमाणे दिवाळीच्या निमित्ताने गाई म्हशीचा परंपरागत खेळ खेळविला जातो. मात्र यावर्षी याठिकाणी पोलीसांनी लाठीचार्ज केल्यामुळे या खेळाला गालबोट लागले आहे. पोलिसांनी अमानुषपणे केलेल्या लाठीचाज मुळे संतप्त नागरिकांनी पोलिसांच्या वाहनावर फटाके फोडले तसेच दगडफेक करून आपला रोष व्यक्त केला. शहरातील मुख्य बाजारपेठ



व जुन्या ग्रामपंचायत कार्यालया समोर असलेल्या वडाच्या झाडाखालीमकाजी बुवा याची पूजा करून शहरातील पशुपालक शेतकरी आपल्या गाई म्हशींची ओवाळणी करून त्यांना खेळवतात ब दिवाळी साजरी करतात. संपूर्ण बाजारपेठ दुपारी दोन वाजता बंद करून हा परंपरागत खेळाचे सादरीकरण केले जाते. मात्र यावर्षी याठिकाणी असलेला पोलीसांच्या अतिरिक्त बंदोबस्त व नागरिकांवर झालेला लाठीचार्जमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. पोलिसांच्या वाहनावर फटाके फोडण्यात आलेत. दारूच्या बॉटल, दगड फेकण्यात आले. यावेळी हौशी तरुण व नागरिकांचा मोठा गदारोळ दिसून आला.

> दरवर्षी शहरात गाई म्हशीचा पारंपरिक खेळ खेळविला जातो. मुख्य बाजार पेठेतील काही नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने त्याठिकाणी बंदोबस्त लावला होता, परंतु याठिकाणी वाहनावर तसेच अंगावर फटाके फोडल्याचा प्रकार घडल्यामुळे लाठीचार्ज करावा लागला. घटनास्थळी परिस्थिती हाताळण्याच्या अनुषंगाने उपाययोजना केल्या.
>
> **- गोपाल उपाध्याय, ठाणेदार.**

## परमपूज्य तान्हाई माता पुण्यतिथी यात्रा महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अंजनगाव सुर्जी-** सिद्धेश्वर श्रीसंत गुलाबबाबा यांच्या मातोश्री प.पु. तान्हाई माता पुण्यतिथी यात्रा महोत्सव २४ व २५ ऑक्टोबरला संपन्न होणार आहे. दरवर्षी भव्य स्वरूपात हा कार्यक्रम पार पडत असतो.सुप्रसिद्ध कीर्तनकार मंडळींचे कीर्तन आयोजित करण्यात येत असतात. याहीवर्षी २४ ऑक्टोबरला सायंकाळी साडेसात वाजता महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार झी टॉकीज फेम रामायनाचार्य ह.भ.प समाधान महाराज शर्मा (बिड) यांचे कीर्तन होणार आहे. २५ ऑक्टोबरला दुपारी ४.३० ते ६.३० दहीहांडी व काल्याचे कीर्तन ह.भ.प अशोक महाराज मोहिते (गुलाबनगर) यांचे होणार आहे. परमपूज्य स्व. तान्हाई माता यांच्या पुण्यतिथी निमित्त यात्रेचे आयोजन करण्यात येते. दिवाळीच्या सुटीत टाकरखेडा येथे तालुक्यातील मंडळी हजेरी लावत असतात. २५ ला संत गुलाबबाबा गावातील आश्रम येथून समाधी मंदिर पर्यंत पालखी सोहळा साजरा होईल. सायंकाळी ६.४५ ला महाआरती व नंतर महाप्रसाद होईल. या पर्वणीचा लाभ भक्त मंडळींनी घेण्याचे आवाहन सिद्धेश्वर श्री संत गुलाबबाबा समाधी मंदिर ट्रस्ट चे विश्वस्त अॅड. गोपाल उमक यांनी केले आहे.

# आय.आय.एम.सी. २०२७ चे शैक्षणिक सत्र बडनेराच्या नवीन इमारतीत सुरू करण्याचे निर्देश

## केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव -संजय जाजू यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
जनसंचार आणि पत्रकारिता क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे भारतीय जनसंचार संस्थान, - आयआयएमसी अमरावतीची बडनेरा येथील प्रस्तावित इमारत २०२७ पर्यंत पूर्ण करा, असे निर्देश केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज दिले. अमरावती महानगर पालिका आयुक्तांच्या निवास स्थानी उच्चस्तरीय आढावा बैठक आज आयोजित करण्यात आली होती.यावेळी महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, केंद्रीय लोक निर्माण विभागाचे मुख्य अभियंता डी. रायचौधरी,आय.आय.एम.सी. स्पेशल प्रोजेक्ट डायरेक्टर रश्मी रोजा , भारतीय जनसंचार संस्थेचे क्षेत्रीय निदेशक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, विशेष कार्य अधिकारी डॉ . मनोज कुमार सोनोने संजय बसेडिया, अभिजीत कावरे, विष्णू राठोड यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.भारतीय जनसंचार संस्थान, अमरावतीचे प्रस्तावित इमारतीचे बांधकाम करताना प्रत्येक टप्प्याची आखणी करा. पहिला टप्पा



दर्जेदाररित्या पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या टप्प्याची निर्मिती करा. बदलत्या हवामानात बांधकाम बंद असतांना इमारतीला लागणारे दरवाजे, खिडक्या व इतर फर्निचरची गुणवत्ता तपासण्याचे काम करून निश्चित वेळेचा सदुपयोग करा, असे निर्देश देत २०२७ चे शैक्षणिक सत्र बडनेराच्या प्रस्तावित नवीन व अत्याधुनिक इमारतीत सुरू करा, असे जाजू यावेळी म्हणाले.केंद्र शासनाच्या वतीने आयआयएमसीच्या नवीन इमारती करिता बडनेरा येथे देण्यात आलेल्या १५ एकर जागेची पाहणी यावेळी सचिव संजय जाजू यांनी केली. या १५ एकर जागेवर शैक्षणिक वर्ग, प्रशासकीय इमारत, क्रीडा संकुल, विद्यार्थी व कर्मचारी निवासस्थानाची आखणी व त्या संबंधित तांत्रिक बाबींची माहिती त्यांनी घेतली. या बैठकीला आयआयएमसी अमरावतीचे कर्मचारीही उपस्थित होते .

दरम्यान अमरावती दौऱ्यापूर्वी सचिव संजय जाजू यांनी आज नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी नागपूरच्या आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आकाशवाणीच्या माध्यमातून जाहिरात संकलनाच्या कार्याला गती देण्याचे निर्देश त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिले . याप्रसंगी आकाशवाणी नागपूरच्या अभियांत्रिकी कार्यक्रम तसेच वृत्त विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच पत्र सूचना कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

# दिवाळीत अमरावती शहरात फुटले राजकीय फटाके

## बच्चू कडू व राणा दाम्पत्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
नवनीत राणा व त्यांचे पती आमदार रवी राणा यांच्याएढी नाटकी दाम्पत्य या देशात कुठेही दिसणार नाही. बायको भाजपत आणि नवरा स्वाभिमान संघटनेत. राणाची बायकोच त्याच्या संघटनेत राहू शकत नसेल, तर मी काय बोलणार, अशा शब्दांत प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्यावर टीका




केली. तसेच राणा दाम्पत्य अत्यंत लाचार असल्याचे देखील कडू म्हणाले. त्यांच्या या टीकेमुळे अमरावतीत भर दिवाळीतच आरोप अन् टीकेची लड फुटली आहे.

माजी खासदार नवनीत राणा यांनी मंगळवारी बच्चू कडू यांच्यावर टीका केली होती. सध्या बरेच लोक नाटक करत आहेत. बाहेर फिरून आमदारांना मारून टाकण्यास सांगत आहेत. अचलपूरच्या माजी आमदाराकडे कोट्यवधींची संपत्ती आहे. पण त्यांनी कधीच आपल्या खिशात हात टाकला नाही. त्यांच्याकडे फक्त इनकमिंग आहे, आऊटगोइंग नाही, असे त्या म्हणाल्या होत्या. यावेळी त्यांनी राज व उद्धव ठाकरे व्यांच्या संभाव्य राजकीय युतीवरही निशाणा साधला होता. मजबुरीचे दुसरे नाव ठाकरे बनल्याची टीका त्यांनी केली होती.

आ. रवि राणा यांचा पलटवार ....तर बच्चू कडू च्या टीकेला आ राणा यांनी लगेचच उत्तर देत बच्चू कडू हा चिल्लर माणूस आहे.शिवसेनेतील बंडावेळी केवळ पैशांसाठीच गुवाहाटीला गेले होते, असा दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. बच्चू कडूंनी आतापर्यंत जी आंदोलने केली, ती केवळ पैशांसाठीच केली. विधानसभेला उमेदवार उभे करून पैसे उकळणे हेच त्यांचे काम व धंदा आहे. हा एक नंबर चिल्लर माणूस असून, त्या चिल्लर माणसाने जास्त वाजू नये, असे त्यांनी म्हटले आहे. रवी राणा यांच्या या टीकेमुळे अमरावतीचे राजकारण चांगलेच तापले आहे.बच्चू कडू यांनी बुधवारी सकाळी राणा दाम्पत्यावर टीका केली होती. राणा दाम्पत्यासारखे नाटकी दाम्पत्य अवघ्या देशात सापडणार नाही, असे ते म्हणाले होते. या पार्श्वभूमीवर रवी राणा यांनी बच्चू कडू यांच्यावर पलटवार केला आहे. ते म्हणाले, बच्चू कडू यांची नौटंकी संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांची आदारांना कापून टाकण्याची भाषा योग्य नाही. त्यांचे कर्तृत्व तरी काय आहे? त्यांनी १०० जणांना तरी रोजगार दिला का? याऊलट शेतकऱ्यांसाठी आंदोलन करताना माझ्या किडनीला इजा झाली. शेतकऱ्याच्या मुलाने बच्चू कडू यांचा निवडणुकीत तब्बल १२ हजार मतांनी पराभव केला. आता ते शेतकऱ्यांचे नाव न घेऊन नौटंकी करत आहेत.एखादे कुत्रे कावरते तेव्हा त्याला उपचारांची गरज असते. बच्चू कडूंवरही उपचार करण्याची गरज आहे. त्यांना योग्य उपचार मिळाले की, ते आपोआप सरेंडर होऊन जाईल. त्यांनी आतापर्यंत जी आंदोलने केली, ती केवळ पैशांसाठीच केली. विधानसभेला उमेदवार उभे करून पैसे उकळणे हे त्यांचे काम आहे. तुम्हाला कुणीही जबाबदारी दिली नाही. तुम्ही मुख्यमंत्र्यांना शिवीगाळ कराल, आमदारांना कापून टाकण्याची भाषा कराल हे चालणार नाही. बच्चू कडू एक नंबरचा चिल्लर माणूस आहे. चिल्लर माणसाने फार वाजू नये. अन्यथा चिल्लर जास्त वाजली की त्याचे परिणाम भोगावे लागतात, असा इशाराही रवी राणा यांनी यावेळी त्यांना दिला.

### बायको भाजपमध्ये व नवरा युवा स्वाभिमानमध्ये का?

बच्चू कडू यांनी बुधवारी त्यांच्या या टीकेचा खरपूस शब्दांत समाचार घेतला. ते हणाले, तुम्हीच गटार गंगेत उभे आहेत. यानंतरही तुम्ही राज व उद्धव ठाकरेंवरटीका करत आहात. तत्पूर्वी, तुम्ही बायको भाजपमध्ये व नवरा युवा स्वाभिमानमध्ये का? याचे उत्तर द्या. याला कसला स्वाभिमान म्हणायचे? ना मान ना स्वाभिमान. राणा एढे नौटंकी जोडपे देशात कुठेही दिसून येणार नाही. बायको भाजपत व नवरा स्वाभिमानत संघटनेत असे कुठे असते का? याची बायकोही याच्या संघटनेत राहू शकत नाही, याच्यावर एवढी नाचक्की येत असेल तर आम्ही काय बोलावे दिवाळीच्या दिवशीही राणांना बच्चू कडूंची आठवण येते. त्यांना देवधर्म आठवत नाहीत. माझी आठवण येते. हा किती जिव्हाळा आहे. किती प्रेम आहे. मी विधान परिषदेसाठी आंदोलन करत असल्याचा त्यांचा दावा आहे. पण हे माझे नव्हे तर तुमचे धंदे आहेत. सगळ्या पक्षांचे पाठिंबे घेऊननिवडणुका लढता. कधी मशिदीत तर कधी मंदिरात जाता. कधी नमाज पढायचा, तर कधी प्रभू रामचंद्रांचे नाव घेऊन राजकारण करता. पण मी मरेपर्यंत कणाच्याही ओंजळीने पाणी पिणार नाही. कुण्या पक्षाचा पाठिंबा घेऊन आम्हीआमदार होणार नाही आम्ही आमच्या ताकदीवर लढू. देवंद फडणवीस यांच्याकडून कार्यक्रम मिळाल्यानंतर तुम्ही दोघे बोलू लागलात, असेही बच्चू कडू यावेळी राणा दाम्पत्यावर निशाणा साधताना म्हणाले.

### बच्चू कडूंना इंजेक्शन देण्याची गरज

रवी राणा यांनी यावेळी बच्चू कडू हे केवळ पैशांसाठीच एकनाथ शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीला गेल्याचाही दावा केला. ते म्हणाले, बच्चू कडू यांच्यासाठी ना बाप बड़ा ना भैया सबसे बड़ा रुपय्या आहे. बच्चू कडू हे केवळ मलिदा खाण्यासाठी मंत्री झाले. चिल्लर माणसाने अशा प्रकारच्या धमक्या देऊ नये. त्यांची मतदारसंघात कोणतीही इज्जत नाही. लोकसभा निवडणुकीत त्यांनी अनेकदा आमच्याशी डील करण्याचा प्रयत्न केला. पण डील तुटल्यामुळे त्यांनी उमेदवार दिला. ते एखाद्या कुत्र्यासारखे महाराष्ट्रभर भुंकत असतात. त्यांना इंजेक्शन देण्याची गरज आहे.

### बच्चू कडू डोनाल्ड ट्रम्पच्याही पक्षात जातील

रवी राणा यांनी यावेळी आपल्या पत्नी नवनीत राणा यांनी भाजपत जाण्याचा हा सर्वस्वी त्यांचा निर्णय असल्याचेही स्पष्ट केले. ते म्हणाले, मी स्वाभिमान पक्षात आहे. नवनीत राणा भाजपमध्ये आहेत. भाजपत जाण्याचा निर्णय सर्वस्वी त्यांचा आहे. देशातील अनेक मोठ्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारले. त्यामुळे त्या भाजपमध्ये गेल्या, त्यांचा तो वैयक्तिक निर्णय आहे. बच्चू कडूही पूर्वी । काँग्रेससोबत होते. नंतर उद्धव ठाकरेंसोबत राहिले. आता ते एकनाथ शिंदेंसोबत आहेत. भविष्यात डोनाल्ड ट्रम्प यांचा एखादा पक्ष आला तर ते त्यांच्यासोबतही जातील.

# ५० हजार देऊन १ लाखांच्या बनावट नोटा घेतल्या विकत

## मुख्य सूत्रधार गाडबैल याला चांदूरबाजार येथून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
बनावट नोटा प्रकरणातील मुख्य सुत्रधाराला नांदगाव पेठ पोलिसांनी अखेर रविवारी चांदूरबाजार येथून अटक केली. ५० हजार रुपये घेऊन त्याने १ लाख रुपयांच्या बनावटी नोटा दिल्याची कबुली पोलिसाना दिली. त्याला न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची कोठडी सुनावण्यात आली. साहिल गाडबैल (रा. चांदूरबाजार) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.रहाटगाव येथील वाईन शॉपीमध्ये काही युवकांनी पाचशे रुपयांची बनावटी नोट चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु दुकानदाराच्या लक्षात येताच त्यांनी नांदगाव पेठ पोलिसांना माहिती दिली, तेव्हा लगेच पोलिसांनी संचित चव्हाण, दीपक खंडारे आणि संघरत्न मोटघरे यांना अटक करून चौकशी केली केली. चौकशीदरम्यान त्यांनी आदित्य रामेकरचे नाव सांगितले. त्या आधारावर पोलिसांनी आदित्य व त्याचा मित्र यश बर्वेला अटक केली. दोघांची कसून चौकशी केल्यानंतर दोघांच्या घराची झडती घेतली असता ४८ हजार रुपयांच्या बनावट नोटा आदित्यच्या घरात मिळाल्या. त्यामुळे याप्रकरणात पोलिसांनी विशेष लक्ष घातले. तसेच एटीसीला माहिती मिळताच त्यांचे पथक अमरावतीला पोहोचले आणि अटकेतील पाचही आरोपींची कसून चौकशी सुरू केली, त्यांनी साहिल गाडबैलचे नाव सांगितले. त्यामुळे पोलीस त्याच्या शोधात होते.अखेर पोलिसांनी रविवारी साहिलला चांदूरबाजार येथून अटक केली. त्याने चौकशीत पोलिसांना सांगितले की, यशच्या माध्यमातून आदित्यला ५० हजार रुपयात बनावट १ लाख रुपयांच्या नोटा दिल्या होत्या. त्यानंतर आदित्य हा मित्रांच्या मदतीने बाजारात बनावट नोटा चालवित होता. मात्र साहिला बनावट नोटा कोणी दिल्या याबाबत चौकशी केली असता पोटे फार्म मार्गावर त्यामुळे याप्रकरणात आणखी मोठे मासे गळाला बनावट नोटा सापडल्याचे तो पोलिसांना सांगत आहे. लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.




# चांदूरबाजार व अचलपूर नगरपरिषदांना विकासासाठी पाच कोटींचा निधी मंजूर

## आ. प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नांना यश

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३चांदुर बाजार** चांदूरबाजार, आणि अचलपुर नगरपरिषदांच्या विविध विकासकामां साठी राज्य शासनाकडून वैशिष्ट्यपूर्ण निधी योजनेअंतर्गत तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हां निधी मंजूर होण्यासाठी लोकप्रिय आमदार प्रवीण तायडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फळ मिळाले असून, मतदारसंघातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.या निधीच्या मंजुरीमुळे दोन्ही नगरप रिषद हद्दीतील सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा विकासाला चालना मिळणार आहे. अचलपूर नगरपरिषदेच्या क्षेत्रात खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे. वाघामाता चौकाजवळ छत्रपती संभाजी महाराज सृष्टी नगीचा विकसित करणे, भगतसिंग चौकातील हनुमान व्यायामशाळा येथे नगरपरिषदेचे नभागृह बांधकाम, जलतरणतलावाजवळ क्रिकेट टर्फ ग्राउंड तयार करणे, कॅम्प विभागातील सर्किट हाऊस येथे जिजाऊ सृष्टी बगीचा विकसित करणे, अचलपूर नगरपरिषदेच्या



प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण, परतवाडा येथील पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर परिसरात सभागृह बांधकाम, पंचायत समिती नगर परिषद प्राथमिक शाळेजवळ आच्छादित क्रीडांगण उभारणी, सुल्तानपुरा येथील श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ सामाजिक सभागृह बांधकाम, अब्बासपुरा येथील कालंका माता (गर्गेची ची देवी) मंदिराजवळ सामाजिक सभागृह उभारणी, तर चांदूरबाजार नगरपरिषद क्षेत्रात पुढील दोन प्रमुख कामांचा समावेश आहे. मोर्शी रोडवरील हिदू स्मशानभूमीचा विकास, माळीपुरा येथील श्री राम मंदिराजवळ सामाजिक सभागृह बांधकाम नागरिकांच्या गरजेनुसार या सर्व कामांची मागणी होत होती. त्यावर आमदार प्रवीण तायडे यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या मंजुरीमुळे अचलपूर आणि चांदूरबाजार शहरांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असून नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे

# शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला दिवाळीचा शिधा

## यशोमती ठाकूर मित्रमंडळ व तालुका काँग्रेस कमिटीचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ तिवसा,**

महाराष्ट्रात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे सोयाबीन, तूर, कपाशी तसेच फळ पिकांचे प्रचंड नुकसान झाले. परंतु दिवाळी सणाच्या तोंडावर शासकीय मदत न पोहोचल्याने शेतकरी हवालदिल झाला. त्यामुळे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष वैभव वानखडे यांनी तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना भेट देत दिवाळीचा शिधा म्हणून किराणा, साडीचोळी देऊन सामाजिक बांधीलकी जोपासली.



> सरकारने जाहीर केलेली मदत एक आशेचा किरण असताना तीसुद्धा तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाली नाही. अनेक पक्ष व संघटनांची आंदोलने, निवेदने झाल्यावर शासननिर्णय निर्गमित झाला, परंतु मुळात शेतकऱ्यापर्यंत खरी मदत पोहोचलीच नाही. त्यामुळे आम्ही हा उपक्रम राबविला.
> **–वैभव वानखडे, तालुका अध्यक्ष काँग्रेस.**

गेल्या पाच महिन्यांत तिवसा तालुक्यात आर्थिक विवंचनेतून सात शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविली. त्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कापूस, फळबाग या पिकांचे अतोनात नुकसान झाले. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. तालुक्यातील सर्वच मंडळांत नुकसानाचा आकडा मोठा आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची आस लागून होती. मात्र तालुक्यातील किती तरी शेतकऱ्यांच्या पदरात अजूनपर्यंत मदत पडली नाही. त्यामुळे दिवाळीसारखा मोठा सण साजरा होणार कसा, अशी परिस्थिती शेतकऱ्यांसमोर आहे. तेव्हा माजी मंत्री यशोमती ठाकूर मित्रमंडळ व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने वैभव वानखडे यांच्या नियोजनातून तालुक्यातील वहा, ममदापूर, शिरजगाव मोझरी, निंभोरा, सालोरा आदी गावांमध्ये झालेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात देत सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना घरपोच दिवाळीनिमित्त किराणा, साडीचोळी देण्यात आली.


यावेळी तालुका अध्यक्ष वैभव वानखडे, मुकुंद पुनसे, नीलेश खुळे, पंकज देशमुख, डॉ. निरंजन गणोरकर, रावसाहेब देवघरे, प्रशांत कांबळे, गजानन चर्जन, संदीप हगवणे, निरंजन कडू, विजय डोंगरे, सूरज चौधरी, प्रतीक खुळे, किशोर समरित, अनिकेत तालन, नामदेव तांबे, किशोर गोरडे, नीलेश हगवणे, दिलीप केचे, प्रशांत साबळे, सरपंच मंदा राठोड, विजय जाधव, राजकुमार इंगळे, गिरिधर राठोड, विनायक तसरे, हिरा राठोड, गौरव चौधरी, आकाश मकेश्वर व पदाधिकारी उपस्थित होते.

# बडनेरा येथे आ. राणा यांच्या हस्ते नरकासूर दहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३बडनेरा** –बडनेरा शहरातील सावता युवक मंडळद्वारा संचालित श्रीराम विजय महोत्सवांतर्गत सावता मैदान (जुने शहर) येथे बुधवारी (ता.२२) सायंकाळी आठ वाजता आमदार रवी राणा यांच्या हस्ते नरकासुर दहन मोठ्या उत्सहात करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निखिल लढके तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चंद्रशेखर भोंदू, आमदार रवी राणा, प्रशांत लांडे, जयंत डेहनकर, रवींद्र तहेकर, गंगाताई अंभोरे, मधुकर श्रीखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेचे सामूहिक पद्धतीने पुष्पहार घालून करण्यात आली.

प्रास्ताविक रवींद्र तहेकर यांनी केले. जयंत डेहनकर यांनी विचार व्यक्त करताना शहराच्या इतिहासाची ओळख करून दिली. पराजयावर विजयाचा दिवस असलेला हा उत्सव सतत ८८ वर्षापासून सुरू आहे. त्याला मिळणारा प्रतिसाद लोकांच्या



गर्दीतून जाणवते. ही परंपरा सतत सुरू राहावी, हा स्वर्गीय विजय नागपुरे यांचा ध्यास होता. त्यांची उणीव जाणवत आहे. असे सांगितले. चंद्रशेखर भोंदू यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. आमदार रवी राणा यांनी बडनेरा शहर माझी अयोध्या आहे. या शहराने माझ्यावर खूप प्रेम केलेआणि मला चौथ्यांना निवडून दिले, असे सांगितले.त्यानंतर लगेच प्रतिकात्मक नरकासुर यांचे दहन आमदार रवी राणा यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला उत्तमराव भैसने,श्रीकांत येते, महेश येते, दिपक महाजन, ईश्वरराव हाडोळे, दिनेशराव डहाके, मधुकरराव श्रीखंडे, वैभव काळे, रामेश्वरराव टवलारे, अजय तन्हेकर, अभिजीत लांडे, विजय तन्हेकर, गौरव महाजन, गौरव बांते, अजय खरबडे, बाळू पातोडे, धिरज वन्हेकर, रोषन घिमे, देवोदास लामे, अनील लढके, चंद्रप्रकाश वकी, विनोद डहाके, भाउराव पवार, प्रदीप मेहेरे, श्रीराम मलपे, प्रमोद नागपूरे, प्रमोद पोकळे, राजेंद्र इंगोले, गणेश महाराज खंडार, सुनील तायडे, अरविंद अंबाडकर, सुभाष सुने, अशोकराव रुमणे, निलेश रुमणे, मनोज संबे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला बडनेरा शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज बडनेराहून मुंबईसाठी तर पुण्यातून येण्यासाठी विशेष ट्रेन

## नागपूर–एलटीटी, नागपूर–हडपसर विशेष गाड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ बडनेरा–**

मुंबई, पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमधील गर्दीमुळे सध्या तत्काळ आरक्षणही मिळेनासे झाले आहे. लक्ष्मीपूजन आटोपल्यानंतर गुरुवारी भाऊबिजेच्या रात्रीपासून तर बुधवार, २९ ऑक्टोबरपर्यंत पुणे व मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल आहे. तसेच जनरल कोचमध्येही पाय ठेवायला जागा नसल्याने प्रवाशांची गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेने शुक्रवार, २४ ऑक्टोबरला नागपुरातून मुंबईला जाण्यासाठी तसेच पुण्याहून बडनेरा येथे परतण्यासाठी विशेष रेल्वेची सोय केली आहे. या विशेष रेल्वेमुळे बडनेराहून मुंबईला जाण्यास इच्छुक अमरावती जिल्ह्यातील प्रवाशांना अतिरिक्त पर्याय मिळाला आहे.

गाडी क्र. ०२१४० नागपूर–एलटीटी स्पेशल २४ रोजी दु. १.३० वाजता नागपुरातून निघाल्यानंतर दु. ४.१० वाजताच्या सुमारास बडनेरा येथे पोहोचेल. त्यानंतर २५ ला पहाटे ४.१० वाजताच्या सुमारास एलटीटी स्थानकावर



पोहोचेल. त्यामुळे मुंबईत ज्यांना दिवसभर काम आहे. किंवा जे नोकरदार आहेत, त्यांना त्यांच्या कार्यालयात पोहोचणे सुलभ होणार आहे. ही विशेष ट्रेन मार्गात वर्धा, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, नाशिक रोड, कल्याण व ठाणे या रेल्वे स्टेशनवर थांबा घेणार आहे. या विशेष गाडीत ३ एसी थ्री टायर, १० स्लीपर, ५ जनरल द्वितीय श्रेणी, २ जनरल द्वितीय श्रेणी कम गार्ड ब्रेक व्हॅन असे कोच आहे. १० स्लीपर कोच असल्यामुळे प्रवाशांसाठी ही सुविधाजनक गाडी आहे.

त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१२०२ हडपसर–नागपूरद्वारे बडनेरा येथे परतणे शक्य होणार आहे. हडपसर येथून दु. ३.५० वाजता विशेष ट्रेन निघाल्यानंतर बडनेरा येथे दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे ३.३० वाजता पोहोचणार आहे. मात्र, २२ रोजी ती ४ तास उशिरा ७.३० वाजता पोहोचली. मार्गात ही ट्रेन उरळी, दौंड, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव, वर्धा या स्टेशनवर थांबे घेणार आहे. या रेल्वेची एक एसी प्रथम श्रेणी, दोन एसी टू टायर, चार एसी थ्री टायर, ६ स्लीपर कोच, ४ जनरल द्वितीय श्रेणी आणि दोन जनरल द्वितीय श्रेणी कम गार्ड ब्रेक व्हॅन अशी संरचना आहे.

# नांदगावला किसान सभेचे आंदोलन सोयाबीन फेकून शासनाचा तीव्र निषेध

## शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करून हमी भावाप्रमाणे खरेदी करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ नांदगाव खंड–**

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने गावा – गावात चौका –चौकात शासनाचा निषेध व्यक्त करण्यासाठी सोयाबीन फेको आंदोलनाची राज्यव्यापी हाक दिली. त्याचाच एक भाग म्हणून नांदगाव खंडेश्वर शहरातील मुंगसाजी चौकात किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांनी आणलेले सोयाबीन जमिनीवर फेकून राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला. राज्यासह जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत आला आहे. यंदा नैसर्गिक आपत्तीने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामध्ये शासनाचे झालेले दुर्लक्ष यामुळेही शेतकरी संकटात सापडला आहे. शासनाने शेत पिकांची नुकसान भरपाई अजूनही दिली नाही. शासनाच्या या उदासीन धोरणाचा विरुद्ध शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

या वेळी किसान सभेचे जिल्हा सचिव शाम शिंदे, माजी युवासेना नेते प्रकाश मारोटकर, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर, तालुका अध्यक्ष, दिलीप महल्ले, वईद



खा पठाण, शत्रुघ्न मगर, मोहसीन शेख, राजीक शेख, बापूजी सुने, ज्ञानेश्वर शिंदे, दिनेश बावणे, किशोर मसराम, सूरज लोमटे, राजेंद्र राऊत, दीपक अंबाडरे, चैतन्य साळवन, गणेश बरगट यांचे सह आदी शेतकरी बांधव उपस्थित होते. तसेच या वेळी इडा पिळा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे, या घोषणा देवून शेतकऱ्यांचा राजा सम्राट बळीराजाचा गौरव दिन साजरा करण्यात आला. खरेदी केंद्र सुरू न झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यामुळे सरकारने ही केंद्र लवकर सुरू करावी,अशी मागणीही यादरम्यान करण्यात आली.

तोटा सहन करावा लागल्याने अडचणीत सरकारने हमीभावाने सोयाबीन ५३२८ रुपये व कापूस ८१०० रुपये क्विंटल दराने, शासकीय खरेदी केंद्र सुरू करावेत, यासाठी सोयाबीन फेकून आंदोलन करण्यात आले. शासनाने सरकारी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू न केल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एकरी १०००० ते १२ हजार एकरी तोटा सहन करावा लागत आहे. फडणवीस सरकारची भूमिका शेतकरी विरोधी असून त्यांचा गगनभेदी घोषणाबाजी करत धिक्कार करण्यात आला.

# नांदगाव पेठ येथे शिवसेनेतर्फे वयोवृद्धांना ब्लँकेट व फराळ वाटप

## सेवाभावी उपक्रमातून दिवाळीचा आनंद द्विगुणित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३नांदगाव पेठ** दिवाळीच्या शुभ पर्वावर अमरावती तालुका शिवसेनेच्या (उ.बा.ठा) वतीने संगमेश्वर महादेव मंदिर परिसरात वयोवृद्धांना ब्लँकेट तसेच फराळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. नितीन हटवार व मित्रमंडळींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सेवाभावी उपक्रमातून वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. चंद्रशेखर गिरी व वामनराव गिरी हे होते. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या '८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण' या ब्रीदवाक्यानुसार शिवसेना समाजकार्यासाठी सदैव तत्पर आहे, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात नुकतेच एस.आर.पी.एफ. अमरावती येथे निवड झालेल्या विवेक बाबुराव साकोरे व कृणाल बबनराव साकोरे यांचा शाल, श्रीफळ व गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आला. तसेच



१०१ वर्षीय वयोवृद्ध शामराव पोकळे व मंदिर सेवेत तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या शामराव महाराज गभणे यांचाही गौरव करण्यात आला. या प्रसंगी विनोद गभणे, मनोज मोरे, विनोद मंडळकर, संतोष मालधुरे, मोरेश्वर मानेकर सर, श्रीकृष्ण साकोरे, विजय कापडे, अविनाश यावले, विनोद सुने, मोरेश्वर इंगोले, पंकज वंजारी, गजानन हटवार, निकु मोहोळ, पवार सर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाला महिला, पुरुष व वयोवृद्ध नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने असा सेवाभावी उपक्रम आयोजित करण्याचा निर्धार या वेळी नितीन हटवार यांनी व्यक्त केला.

# दिवाळीच्या फटाक्यांमुळे रोजच्यातुलनेत अडीचपट वाढले प्रदूषण

## परिणाम रात्री ८ ते १० या वेळेत; इतर वेळेला १२५ होता एक्यूआय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** – हवेच्या गुणवत्ता निर्देशांकावरून (एक्यूआय) एखाद्या शहराचे वायूप्रदूषण किती आहे, हे ठरवले जाते.अमरावती शहराचा एक्यूआयसरासरी १२५ असतो. पण दिवाळीच्यादिवशी फोडल्या गेलेल्याफटाक्यांमुळे रात्री आठ ते दहा यावेळात तो तब्बल अडीचपट वाढून३१४ वर पोहोचला होता. ही बाबशास्त्रीयदृष्ट्या 'व्हेरी पुअर' याव्याख्येत मोडते. त्यामुळे त्या दोनतासांत आजारी नागरिकांना श्वासघेण्यासाठी काहीसा त्रास जाणवलाअसेल, असे महाराष्ट्र प्रदूषणनियंत्रण मंडळाचे (एमपीसीबी)म्हणणे आहे.

या वर्षीच्या दिवाळीलामंगळवारी रात्री शहराच्या अनेकभागात धुराचे लोट उठताना दिसले.हे लोट फटाके फोडल्यामुळेनिघालेल्या धुरांचे होते. त्यामुळेरात्रीच्या वेळी वायू प्रदूषणातबऱ्यापैकी वाढ झाली होती. येथीलशिवाजी महाविद्यालयाच्या हवामानकेंद्राने या वायू प्रदूषणाची नेमकीमोजदाद केली आहे. दरम्यान नागपूरयेथील हवामान खात्याचे स्थानिकअधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषणनियंत्रण मंडळाने देखील याआकड्यांना दुजोरा दिला असून,मंगळवारच्या रात्री अमरावतीचेआकाश काही काळासाठी ३०१ ते ४०० च्या दरम्यानच्या 'व्हेरीपुअर' या व्याख्येत पोहोचले होते. शहराचामुख्य परिसर असलेल्या अंबागेटच्या आतीलजुने शहर आणि कॅम्पसह विद्यापीठ रोड,वडाळी, श्रीकृष्ण पेठ, राजकमल चौक,साईनगर, गाडगेनगर आदी भागांमध्ये हीचआकडेवारी कायम होती, असे एमपीसीबीचेम्हणणे आहे. एरव्ही अमरावती शहराचारोजचा हवा गुणवत्ता निर्देशांक हा १०१ ते २००या मॉडरेट व्याख्येत मोडणारा असतो. याचीमोजदाद सरासरी १२५ ते १३० असते.



तज्ज्ञांच्या मते हवेतील धूलिकण आणिवाहनांमधून होणारे कार्बन डायऑक्साइडचेउत्सर्जन यामुळे हवा प्रदूषित होते. परंतुअमरावती शहराच्या काही भागांत असलेल्याहरित पट्ट्यांमुळे ते नियंत्रितही केले जाते.त्यामुळे हे शहर ६ ते १० लाखलोकसंख्येच्या महानगरांपैकी शुद्ध हवेचेएक महानगर म्हणून ओळखले जाते.दरम्यान दिवाळीच्या दिवशी वाढलेल्याप्रदूषणामुळे मात्र काही वेळासाठी तेवेगळ्या व्याख्येत गेले होते. हवामानकेंद्राने केलेल्या मोजणीनुसार अमरावतीशहराचा त्यादिवशीचा एक्यूआय हा १२५होता. रात्री ८ नंतर मात्र तो बदलला आणिदहाच्या पुढे पुन्हा सामान्य झाला. दरम्यानजिल्ह्यातील इतर तालुक्याचा एक्यूआयसुद्धा६९ ते १२५ दरम्यान फिरत राहिला.

यंदा दिवाळीत काही प्रमाणातझालेला हरित फटाक्यांचा वापरआणि ऐन लक्ष्मीपूजनाच्या काहीवेळ आधी दुपारी आलेला पाऊसयामुळे धूलिकण दाबले गेले. याचापरिणाम म्हणूनही दिवाळीतफटाक्यांचे प्रदूषण अधिक प्रमाणातजाणवले नाही. केवळ रात्री ८ ते १०या वेळेत फटाके फोडल्यानेप्रदूषणाची पातळी काहीशी वाढूनएक्यूआय ३१४ वर पोहोचला होता.

**नागरिकांनी अशी घ्यावीदिवाळीमध्ये काळजी**

वायू प्रदूषणाची पातळी वाढतअसताना सार्वजनिक आरोग्याचेधोकेही वाढतात. विशेषत: मुले, वृद्धआणि श्वसन किंवा हृदय वरक्तवाहिन्यांसंबंधी समस्याअसलेले व्यक्ती हे सामान्यत: खराबहवेच्या गुणवत्तेमुळे प्रभावित होणारेपहिले गट असतात.

# प्रविण पोटे पाटील यांची अनाथ व पारधी समाजातील कुटुंबांसोबत दिवाळी साजरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळी हा सण म्हणजे आनंद, आपुलकी आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची परंपरा. हा सण केवळ आपल्या घरापुरता मर्यादित न ठेवता, समाजातील दुर्बल व वंचित घटकांसोबत साजरा करत खऱ्या अर्थाने दिवाळीला सामाजिक भान प्राप्त होते. अशाच सामाजिक जाणिवेतून पोटे पाटील कुटुंबियांनी अनाथ बांधव आणि पारधी समाजातील चिमुकल्यांसोबत दिवाळी साजरी करत एक स्तुत्य उपक्रम राबविला.

या उपक्रमांतर्गत प्रविण पोटे पाटील, श्रुतीताई पोटे पाटील व श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते या चिमुकल्यांना मिठाई, फटाके तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हसू पाहून खरे समाधान लाभल्याची भावना पोटे पाटील कुटुंबियांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान शिवराय कुळकर्णी, चेतन पवार, सुरेखाताई लुंगारे, भारती गुहे, संध्याताई टिकले, प्रकाश पुंड, डॉ. बबन लायदे, मनीष चौबे, अभिजित वानखडे, अंकित कावळे, कावरे साहेब, चक्रे साहेब यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी कार्य करण्याची ही प्रेरणादायी बाब असल्याचे प्रतिपादन उपस्थितांनी केले.

# दीपोवत्सात दिव्यांनी उजळली स्मशानभूमी

## वडाळी मोक्षधाममध्ये अनोखा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळीनिमित सायंकाळी सर्वत्र तुकतुकत्या दिव्यांचा प्रकाश पडत असताना अमरावती शहरातील बहाळी परिसरात असणाऱ्या स्मशानभूमीत रात्री दिव्याची राग लुकलुकताना पहायला मिळत आहे. अनेक पिढ्यांपासून या स्मशानभूमी परिसरातील अनेकांच्या घरातील मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आलेत. परिसरातील युवकांनी स्मशानभूमी परिसर स्वच्छ करून सर्व मृत व्यक्तींच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी स्मशानभूमी दिव्यांच्या प्रकाशाने उजळून टाकली.

पूर्वी नगरपालिका आणि आता महापालिकेच्या हद्दीत बडाळी परिसर असला तरी या परिसराचा उल्लेख गावठाण असाच आहे. चांदूररेल्वे मार्गावर असणार्या वडाळी गावाच्या भाग सोडला तर इतर भागात मोठ्या स्मशानभूमीची मोठी जागा ही राज्य राखीव पोलीस दलाच्या हद्दीत गेली. उर्वरित भागात आज अंत्यसंस्कार विधी होतात. स्मशानभूमीचा ३० टक्केप्रमाणात झुडूपे तयार झालीत. पावसाळ्यात दिवसासुद्धा स्मशानभूमीत अंत्ययात्रेसाठी जाणे कठीण, परिसरातील काही युवकांनी चार वर्षांपासून स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम हाती घेतली. स्मशानभूमी कचरामुक्त करण्याचे काम हाती घेतले. हळूहळू स्मशानभूमीतील झुडुपे काढली. विविध झाडे लावलीत.

लोकप्रतिनिधींकडे निवेदन सादर करून आमदार निधीतून स्मशानभूमीत शेड व इतर व्यवस्था करून घेतली. आता वेळ मिळेल तेव्हा या युवकांकडून स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण यासह विविध सुधारणांची काम केली जातात.स्मशानभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारासह ज्या भागात अंत्यविधी होतो. बासह लोकांना ठाण्याकरिता बांधण्यात आलेले जुने आणि नवीन या प्रतीक्षालयात दिवे लावण्यात आलेत. विशेष म्हणजे दिवे लागल्यावर शांत आलेल्या या परिसरात आनंदानी बातावरण निर्माण झाले. तीन-चार वर्षांपासून स्मशानभूमी स्वच्छ सुंदर व्हावी बासाठी सुरू असणार्या प्रयत्नांना परिसरातील नागरिक आणि लोकप्रतिनिधी आणि महापालिका प्रशासनाचा हातभार लागावा अशीच अपेक्षा या तरुणांच्यावतीने व्यक्त केली जाते आहे.

# बालकाना करुणा, प्रज्ञा , शिलाचे संस्कार देणे काळाची गरज : डॉ. कमलताई गवई

## पंचशील नगर येथे भारतीय बौद्ध महासभेची ३५८ बुद्ध वंदना उत्साहात




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

बुद्ध धम्म हा मानवी मनाला शांतता देणार विज्ञान आहे. धम्म आचरणात आणणे आवश्यक आहे. माणसाने माणसाशी कसे वागावे हेच धम्म सांगतो. बाल गुन्हेगारी ही सामाजिक समस्या असली तरी तिचे समाधानही सामाजिकच आहे. प्रत्येक बालकाला करुणा शिकवली, प्रज्ञा दिली, शिलाचे संस्कार दिले तर भविष्यात एक असा समाज निर्माण होईल जिथे गुन्हा नव्हे तर करुणा राज्य करेल. मनाचे शुद्धीकरण हेच धम्मकार्य आहे. कायदा हा गुन्हा थांबवतो मात्र करुणा मन बदलविते असे प्रतिपादन माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांनी केले

भारतीय बौद्ध महासभा शाखा बडनेरा अमरावतीच्या वतीने रविवारची ३५८ बुद्ध वंदना पंचशील नगर येथील महाबोधी बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात पार पडली यावेळी माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, जिल्हाध्यक्ष प्रकाश बोरकर महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया धांडे, बडनेरा शहराध्यक्ष के डी सांभारे, नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे, महिला आघाडी कोषाध्यक्ष मालती मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते दत्तराज गजभिये, नरेंद्र बोरकर, व्ही. एम. वानखडे, आर. के. भटकर धम्मपिठावर विराजमान होते. भारतीय बौद्ध महासभेचा रविवारची बुद्ध वंदना गत नऊ वर्षापासून सुरू असलेला हा उपक्रम स्तुत्य समाजाला दिशा देणारा असल्याचे प्रतिपादन डॉक्टर कमलताई गवई यांनी केले. यावेळी शांताराम गेडाम यांनी कालाम सूक्त (मानव मुक्तीचा जाहीरनामा) या विषयावर धम्मदेशना दिली. तर उपस्थित मान्यवरांनी पंचशील नगर येथील बाल गुन्हेगारीच्या समस्येवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव नयन मोंढे यांनी केले. संचालन समता सैनिक दलाचे सुरेश दहाटे यांनी तर आभार महिला मंडळाचे अध्यक्ष संजीवनी मनोहरे यांनी मानले. रविवारच्या विशेष बुद्ध वंदनेला यशस्वी करण्याकरिता राहुल शेंडे, विलास नागदिवे, किशोर खोब्रागडे, पंजाब गेडाम, अशोक गुडघे,मदन खंडारे, लता माटे, विजया बोरकर, वंदना फुललेले, दुर्गा वाहने, रेखा मनोहरे,भागीरथा ढोके, बि डी सांबारे, सुनिता रामटेके, आशा सोमकुवर, पार्वती गजभिये, ममता ढोले, बेबी वानखडे,प्रमिला वानखडे, कमल मेश्राम, पल्लवी मेश्राम, रणधीर कापशीकर, संतोष डोंगरे, अशोक बनसोड, अशोक तायडे, यश वानखडे, मुकुंद मेश्राम,रवींद्र गेडाम,गोवर्धन रामटेके, सुरेश दहाटे, जीवक मनोहरे, नरेंद्र बोरकर,शांताराम गेडाम, राजेंद्र भटकर, आनंद मोंढे यांनी सहकार्य केले.

# धामणगावात रविवारी क्षत्रिय मराठा कलार समाजाचे महासंमेलन युवक युवतींचा परिचय मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धामणगाव रेल्वे**

सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक व विविध विषयावर विचार मंथन करण्यासाठी रविवारी क्षत्रिय मराठा कलार समाजाचे महासंमेलन धामणगावात आयोजन केले असून येथे युवक -युवती परिचय मेळावा होणार आहेकलार समाजाचे आराध्य दैवत सहस्त्रबाहू अर्जुन जयंती निमित्त हे महासंमेलन माहेश्वरी भवन येथे येत्या रविवारी सकाळी अकरा वाजता आयोजित केले आहे येथे विविध विषयावर विचार मंथन होणार आहे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, युवक युवती परिचय मेळावा आयोजित केला आहे या कार्यक्रमाला विदर्भातील मान्यवर उपस्थित राहणार आहे समाजातील प्रतिभावंताचा गौरव करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला समाज बांधवांनी हजर राहण्याचे आवाहन संयोजक विनोद धूवे व माधव शेंडे यांनी केले आहे.

# तिवसा येथे श्री छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयास ८० लक्षांचा निधी

## वाचनालयाच्या वतीने सत्कार सोहळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३तिवसा**

श्री छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, तिवसा येथे वाचनालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ८० लक्ष रुपये निधी मंजूर झाल्याबद्दल वाचनालयाच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास वाचनालयाचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक, शिक्षकवृंद तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात वाचनालयातील विद्यार्थ्यांनी विविध प्रशासकीय आणि कार्यकारी पदांवर कार्यरत असलेल्या अधिकार्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या प्रसंगी वक्त्यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हटले की, श्री छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय हे तिवसाचे एक ज्ञानमंदिर आहे. येथील वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्यासाठी आधुनिक, सुबक आणि सुसज्ज इमारत उभारली जाणार आहे. या इमारतीत तरुणांसाठी अभ्यासिका, वाचन कक्ष आणि डिजिटल लायब्ररीची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.कार्यक्रमानंतर नियोजित इमारतीच्या जागेवर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दिवाळी पाडव्याचा सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला तिवसा शहरातील नागरिक, ग्रंथप्रेमी विद्यार्थी, समाजसेवक आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

# भारतीय राज्यघटना सर्वधर्मसमभावावर उभी आहे : अ‍ॅड. यशोमती ठाकूर

## दोनद लुंबिनी बुध्द विहारात धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नांदगाव पेठ**

हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिमसह इतर सर्व धर्माचा आदर करणे म्हणजे सनातन धर्म. भगवान बुद्धांचे चिवर हे भगवे आहे आणि भिक्खूच्या चिवरसमोर सर्व मानव समान आहेत. भारतीय राज्यघटना देखील सर्वधर्मसमभावावर उभी आहे. त्यासाठी जय भीमचा नारा बुलंद आहे आणि म्हणूनच आपण जय भीम म्हणतो, असे प्रतिपादन माजी मंत्री अ‍ॅड. यशोमतीताई ठाकूर यांनी केले.लुंबिनी पीपल्स डेव्हलपमेंट सोसायटी, दोनदच्या विद्यमाने ६९ वा धम्मचक्र प्रवर्तनदिन दोनद येथील लुबीनी बुध्द विहारात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक मतदारचे मुख्य संपादक अ‍ॅड. दिलीप एडतकर होते तर प्रमुख पाहुणे किशोर बोरकर, प्रा. गोपीचंद मेश्राम, डॉ. कमल राऊत, रमेशचंद्र रामटेके, सुरेश तायडे, डॉ. विजय हटकर, जगदीश गोवर्धन, हरीश मोरे, किशोर भिलकर, सतीश गोटे,निलेशसरोदे हे होते. राज्यवर्धन बागडे यांनी पंचशील ध्वजारोहण केले. भदंत महाथेरो बुद्धघोष यांनी उपस्थित समुदायास त्रिशरण बुद्धवंदना दिली. लुंबीनी बुद्ध विहाराकरिता ज्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेती दान करण्यात आली त्या शामराव खडसे यांच्या ६५ व्या स्मृतिदिनासह मुलताबाई खडसे, अंबादास खडसे, सीताबाई खडसे, आत्माराम रायबोले, लक्ष्मणराव गवई, श्रावण बागडे, सूर्यभान मेश्राम, मंदाताई मोलके, काशिनाथ खडसे, अशोक पांडे, हरिभाऊ ब्राह्मणे, येनूताई खडसे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

लुंबीनी बुद्ध विहार निर्मितीबद्दल अ‍ॅड. पी. एस. खडसे व बाळकृष्ण खडसे यांच्यासह कार्यकारिणी सह सदस्यांची अ‍ॅड. यशोमतीताई ठाकूर यांनी प्रशंसा केली. नंदकुमार खडसे यांच्या सर्वधर्मसमभाव गीतमाला पान या पुस्तकाचे विमोचन यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता भैय्या मनोहर, पुरुषोत्तम मनोहर, गौतम खडसे, ज्ञानेश्वर सुखदेवे, ओंकार या कोल्हे, साबळे, विश्वा खडसे, शबू बाळ मनोहर यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला महिला मंडळासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे सचिव प्रभाकर शेंडे यांनी केले.

# खासगी व्यापाऱ्यांकडे पहिल्या वेचणीचा कापूस, भाव ठरवतो शेतकरीच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अतिवृष्टी, सततचा पाऊस,ढगाळ वातावरणाने कपाशीचे मोठे नुकसान झाले जिल्ह्यात 'सीसीआय'ची कापूस खरेदी सुरू झालेली नाही. यामुळे दिवाळी साजरी करण्यासाठी शेतकऱ्यांना पहिल्याच वेचणीचा कापूस खासगी व्यापाऱ्यांना मागेल त्या दरात कवडीमोल विक्री करण्याची वेळ आली. शासन खरेदी केंद्र बंद असल्याने व्यापाऱ्यांच्या दरात कमी करण्यात आली आहे.

अतिवृष्टी व सततच्या पावसाने कपाशीचे मोठे नुकसान झाले. शिवाय कापसाचा हंगाम लांबणीवर पडला. यंदा काही भागात आता सीतादही होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांजवळ फारसा कापूस नाही. आतापर्यंत जो काही कापूस निघाला, तो खासगी व्यापाऱ्यांकडे विक्रीला आणला असता सात हजार रुपये क्विंटलपर्यंत भाव मिळाला आहे.कीड व रोगांमुळे कपाशीच्या बोंडांची गळ झाली. आता लाल्याचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यातच शासनाद्वारा आयात शुल्कात कमी केल्याने कापसाच्या दरावर मोठा फटका बसला आहे.

**जिल्ह्यात अडीच लाख हेक्टरमध्ये कपाशी**

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात अडीच लाख हेक्टरमध्ये कपाशीचे क्षेत्र आहे. खरिपाच्या एकूण पेरणी क्षेत्राचे तुलनेत हे ३५ टक्के आहे मात्र, यंदा निसगण साथ न दिल्याने शेतकरी अडचणीत आले आहे.

**कापसाला यंदा इतका हमीभाव**

चालू हंगामासाठी (२०२५-२६) लांब धाग्याच्या कापसासाठी केंद्र सरकारने ८,११०रु. प्रतिक्विंटल आणि मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७,७१० रु. प्रतिक्विंटल इतका हमीभाव जाहीर केला आहे. मात्र, सध्या बाजारात यापेक्षा कमी दर मिळत आहे.

# नाना पटोले सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर; काँग्रेसमध्ये चर्चांना उधाण

## माजी प्रदेशाध्यक्ष भाजपमध्ये परतणार असल्याच्या अटकळांना बळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

माजी प्रदेशाध्यक्ष आणि काँग्रेस नेते नाना पटोले सध्या सार्वजनिक जीवनातून अलिप्त आहेत. एकेकाळी सातत्याने टीव्हीवर दिसणारे आणि बातम्यांमध्ये राहणारे पटोले गेल्या काही महिन्यांपासून कोणत्याही कार्यक्रमात दिसले नाहीत. अखिल ओबीसी समाजाच्या मेळाव्यापासूनही ते दूर राहिले. त्यांच्या या अलिप्ततेमुळे विविध चर्चांना उधाण आले आहे.

पटोले पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा तर्क लावला जात आहे. मात्र, भाजपच्या नेत्यांनी या शक्यता नाकारल्या आहेत, तर काँग्रेसचे नेते यावर विश्वास ठेवायला तयार नाहीत. नाना पटोले यांच्या या बदललेल्या भूमिकेमुळे काँग्रेस नेत्यांनाही प्रश्न पडला आहे.

नाना पटोले यांनी यापूर्वी भाजपचे खासदार म्हणून काम केले आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत काँग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश केला होता. राहुल गांधी यांनी त्यांना राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्यास सांगितले होते आणि किसान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्षपद दिले होते. त्यांनी गोंदिया-भंडारा मतदारसंघातून प्रफुल्ल पटेल यांचा लोकसभेत पराभव केला होता. त्यानंतर त्यांनी नागपुरातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना आव्हान दिले होते, परंतु त्यात त्यांना यश आले नाही.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर ते पुन्हा भंडारा जिल्ह्यात परतले आणि विधानसभेत निवडून आले. महाविकास आघाडीचे सरकार राज्यात आल्यानंतर त्यांना विधानसभेचे अध्यक्षपद मिळाले.मात्र, त्यांच्या बंडखोर



वृत्तीमुळे ते अध्यक्षपदाच्या मर्यादित भूमिकेत रमले नाहीत. त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्या बदल्यात काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्षपद मिळवले. राहुल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेमुळे त्यांना आणखी बळ मिळाले आणि राहुल गांधींसोबत त्यांचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. लोकसभा निवडणुकीत उमेदवार निवडण्याचे अधिकार त्यांच्या हाती होते, ज्यामुळे पक्षात त्यांचे वजन वाढले. काही काँग्रेस नेत्यांच्या मते, त्यांची एकाधिकारशाहीही वाढली होती.याबाबत अनेक नेत्यांनी दिल्लीत तक्रारी केल्या होत्या. मात्र, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर या तक्रारींचा फारसा परिणाम झाला नाही. काँग्रेसने आगामी विधानसभा निवडणूकही त्यांच्याच नेतृत्वात लढण्याचा निर्णय घेतला होता.

लोकसभा निवडणुकीचा निकाल बघून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येईल, असेच सर्वांना वाटत होते. असे झाल्यास नाना पटोले मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख दावेदार होते. हे बघता प्रदेशाध्यक्ष या नात्याने महाविकास आघाडीतील तीन पक्षांसोबत वाटाघाटी, बोलणी आणि जागा वाटपाचा निर्णयात त्यांनी जास्तच हस्तक्षेप केला. १०० जागांवर ते अडून बसले होते. ज्याचे जास्त आमदार त्या पक्षाचा मुख्यमंत्री असे सूत्र ठरले होते. याकरिता पटोले जास्तीत जास्त मिळाव्या यासाठी आग्रही होते. जागा वाटपाच्या मात्र शेवटच्या आघाडीत मोठा असंतोष निर्माण झाला. त्यानंतर राहुल गांधी यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. नाना पटोले यांना या सर्व प्रक्रियेपासून लांब ठेवण्यात आले. निवडणुकीच्या निकालाने पटोल यांच्यासह महाविकास आघाडीला जबर धक्का बसला. संपूर्ण चित्रच पालटून गेले. आघाडीचा दारुण पराभव झाला. पराभवाचे सर्व खापर काँग्रेसने पटोले यांच्यावर फोडले. त्यांना प्रदेशाध्यक्षपद सोडावे लागले.

विधिमंडळ पक्षाचे नेते होण्याची त्यांची इच्छाही काँग्रेसने पूर्ण केली नाही. त्यानंतर ते हळूहळू दुरावत गेले. आता दिसेनासे झाले आहेत. भाजपात आधीच गर्दी झाली आहे. त्यांना परत भाजपमध्ये घेण्यास अनेकांचा विरोध आहे. या उपरही भाजपात गेल्यास पदाचा प्रश्न आहे. त्यामुळे भाजपात जाऊन ते काय करणार? असा प्रश्न आहे. दुसरीकडे काँग्रेसमध्ये असतानाही त्यांच्याकडे कुठलीच जबाबदारी देण्यात आलेली नाही.

# ओवाळते मी.... लाडक्या भाऊराया ....





चंद्र हा गगनी हासतो बघुनी. चांदणे शिंपुनी करी माया. ओवाळीते मी लाडक्या भाऊराया, जिल्हयाचे खासदार बळवंत वानखडे यांना आज भाऊभीज निमित्य काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांना ओवाळणी घालत भाऊभीज साजरी केली.

# ग्रामीण भागातील दिवाळी उधार-उसनवारीवरच साजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दरवर्षी खरीप हंगामातील सोयाबीन हाती आल्यानंतर दिवाळी साजरी करण्यास शेतकऱ्यांना आधार वाटत होता. गतवर्षी सोयाबीनने धोका दिले. यावर्षी देखील अतिवृष्टीने हे पीक वाया गेले. एक-दोन अपवाद वगळल्यास खरेदी केंद्रच सुरू झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उधारी-उसनवारीवर दिवाळी साजरी करावी लागली. शहरात फटक्यांची आतषबाजी तर ग्रामीण भागात दुःख गिळून अगदी साध्या व पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी केल्याचे दिसून आले.दिवाळीच्या आगमापूर्वी आठवडाभर खरेदीची धुमसुरू होती. नोकरदार वर्गापासून सर्वसामान्य क्षमतेप्रमाणे तर नागरिकांनीही आपल्या दिवाळीची खरेदी केली. त्यामुळे शहरात दिवाळीचा उत्साह ओसंडून वाहत असल्याचे दिसून आला. परंतु, ग्रामीण भागात यंदा वेगळेच चित्र होते. आठवडी बाजारांमध्ये यंदा गर्दीच आढळली नाही. दरवर्षी खरिपातील सोयाबीन पीक ऐनदिवाळीत निघत असते. यंदा पावसाअभावी मार खाल्ल्याने हे पीक दिवाळीत हाती येऊ शकले नाही. सोयाबीन झाले असते तर शेतकरी या पिकाच्या भरवशावर आनंदात दिवाळी साजरी केली असती. पण, हाती पैसाच नसल्याने उधारी-उसनवारी करून पारंपरिक दिवाळीत आनंदात मानला. अनेकांनी यंदा दिवाळी मुलाबाळांना नवे कपडे देखील खरेदी केली नाही.

# दिवाळीला बाजारपेठेत कोट्यवधींची झाली उलाढाल; जीएसटी कपातीने बाजारात ग्राहकांची संख्या वाढली

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळीच्या आनंदात अमरावती जिल्हा बाजारपेठ सध्या खरेदीने गजबजलेली आहे. २०२५ च्या दिवाळीत कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, गृहसजावट, मिठाई, आणि फटाक्यांच्या खरेदीमुळे कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीने स्थानिक अर्थव्यवस्थेत भरघोस चमक आणली आहे. वस्तू व सेवा करात घसर झाल्याने ग्राहकांची गर्दी वाढली असून, बाजारपेठेत उत्साहाचा ऊहापोह मिळतोय. पहायला प्रमुख बाजारपेठांमध्ये दिवाळीची रंगत उंचावली आहे.

कपडे, गृहसजावट, इलेक्ट्रॉनिक्स, मिठाई, फटाके, ड्रायफ्रूट्स, किराणा वस्तू, आणि फर्निचर यांसारख्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी होत आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून एलईडी लाइट्स, मिक्सर, मायक्रोवेव्ह, टीव्ही, मोबाइल, आणि रेफ्रिजरेटर या उत्पादनांवर सूट आणि ऑफरमुळे विक्री वाढली आहे. दुकानदार आकर्षक प्रकाश आणि सजावट करून खरेदीदारांना आकर्षित करत आहेत. खास करून महिलांमध्ये गृहसजावटीची वस्तू जसे रंगीबेरंगी परदे, रंगोळी साहित्य, तोरण, आणि मातीच्या दिव्यांची मागणी खूप झाली.



दररोजच्या बाजारात लाखो रुपयांच्या उलाढालीचा अंदाज असून, दिवाळीच्या सणानिमित्त एकूण उलाढाल कोट्यवधींच्या गाठाशी पोहोचल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जाते. २०२५ च्या दिवाळीच्या सुरुवातीच्या दिवसांत बाजारात शुकशुकाट कमी होऊन अचानक खरेदी वाढल्यामुळे अनेक दुकानांत ग्राहकांची मोठी गर्दी दिसून आली. पुढील दिवसांत हा व्यापाराचा उत्साह अधिक वाढणार, अशी अपेक्षा आहे. पारंपरिक फटाके आणि मिठाईपासून पर्यावरणस्नेही उत्पादनांची मागणी वाढत असून, सुगंधी आणि शुगर फ्री मिठाई उत्साहवर्धक ठरत आहे.

**दुकानदारांची खास ऑफर्स, ग्राहकांना फायदा**

जिल्ह्यातील दुकानदारांनी आपल्या दुकानांमध्ये खास ऑफर्स आणि सवलती जाहीर केल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांना मोठा फायदा होत आहे. कपड्यांपासून ते इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत विविध उत्पादनांवर सवलती दिल्या जात आहेत. काही दुकानदार १० ते २५ टक्केपर्यंत डिस्काउंट देत आहेत, तर काही ठिकाणी नो-कोस्ट ईएमआय आणि एक्स्चेंज ऑफर्स तर आहेत.गृहसजावट, मिठाई, फटाक्यांसह फर्निचर आणि किचन वस्तूंवरही खास ऑफर्स सुरू आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक दुकानांमध्ये आकर्षक प्रकाशवाढ आणि सजावटही करण्यात आली आहे. या ऑफर्समुळे दिवाळी खरेदी अधिक सुलभ आणि परवडणारी झाली असून, ग्राहक मोठ्या संख्येने बाजारात गर्दी करत आहेत.

**कपड्यांच्या विक्रीत १५-२० टक्के**

जिल्ह्यात यंदा दिवाळीच्या सणाच्या काळात कपड्यांच्या विक्रीत १५-२० टक्के वाढ नोंदवली गेली आहे. जीएसटीमध्ये कपात होण्याच्या परिणामी ग्राहकांची संख्या वाढली असून, त्याचा विक्रीवर सकारात्मक परिणाम झाला आहे. मुख्यतः पाकळी, तयार कपडे, साड्या, पुरुषांसाठी कुर्ता-पायजमा, आणि मुलांच्या शाळेचे युनिफॉर्म यांची खरेदी जोरात चालली आहे. सवलती आणि सेल ऑफर्स ग्राहकांना आकर्षित करत असून, बाजारपेठेत गर्दी वाढली आहे.

# विज्ञानात डोके चालणार; गणित पक्के होणार, झेडपीची पोरं हुश्शार होणार

## डिजिटल शैक्षणिक साहित्य मिळणार राज्य शासनाचा खान अकादमीशी सामंजस्य करार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

गणित आणि विज्ञान विषयातीलविद्यार्थ्यांचे पायाभूत ज्ञान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी 'खान अकादमी'सोबत पाच वर्षाचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार खान अकादमीच्या मदतीने मुले घरीदेखील अभ्यास करू शकणार आहेत. कुठल्याही घरातून प्रत्येक मुलाला जगातले सर्वोत्तम शिक्षण मिळू शकणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ होणार आहे.जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते दहावीपर्यतच्या विद्यार्थ्यांना खान अकादमीच्या माध्यमातून डिजिटल शैक्षणिक साहित्य मोफत मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राच्या अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञानविषयक शैक्षणिक सामग्री अध्यापन व अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाणार आहे.या माध्यमातून विद्यार्थी शाळेत तसेच घरी बसून विज्ञान आणि गणिताचे धडे गिरवणार आहेत. ग्रामीण भागातील मुलांसाठी हा उपक्रम ज्ञान वाढविणारा ठरणार आहे.

**डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम**

राज्य शासनाने खान अकादमीशी सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबविणार आहेत. तंत्रज्ञानाच्या मदतीसह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी शासनाचा हा कार्यक्रम आहे.

# जमिन विक्रीची निविदा काढून सचिव झाले मिस्टर इंडिया

## नांदगाव बाजार समितीमधील प्रकार, सचिवाच्या स्वाक्षरीची अट टाकल्याने कित्येक निविदा धारक वंचित; सहकार विभागाकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

नांदगाव खंडेश्वर बाजार समितीने १.०३ हेक्टर क्षेत्रफळ जमिनीच्या विक्रीसाठी निविदा प्रसिद्ध केली. परंतु यामध्ये जिओ टॅगिंगवर सचिवाच्या स्वाक्षरीची अट टाकून बाजार समितीचे सचिव चक्क बाजार समिती मधून गायब झालेले आहेत ऑनलाइनची निविदाची अंतिम तारीख २४ असताना देखील ते बाजार समिती मध्ये प्रगटलेच नाही त्यामुळे कित्येक निवेद्यधारक या निवेदधारपासून वंचित राहिलेले आहे त्यामुळे याबाबतची तक्रार निवेद्यधारक शुभम रवींद्र मुंदे यांनी सहकार विभाग कडे दिलेली आहे ,याप्रकरणी त्यांनी मुदतवाढीची मागणी केलेली आहे,



तालुक्यातील लोणी येथील १.०३ हेक्टर क्षेत्रफळाच्या जमिनीच्या विक्रीसाठी नांदगाव बाजार समितीच्या वतीने निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जमिनीची मूल्य अंदाजे ३८.१० लाख रुपये ठेवण्यात आले असून याकरिता १३ ते २० ऑक्टोबरची मुदत निविदा सादर करण्याकरिता देण्यात आली आहे. तर ऑनलाईन ची तारीख ही २४ ऑक्टोबर पर्यंत होती ,परंतु याकरिता जिओ टॅगिंग करणे गरजेचे आहे. या जियो टॅगिंगवर बाजार समितीच्या सचिवाचा शिक्का व स्वाक्षरीची अट घालण्यात आली आहे. १३ ला ही निविदा जाहीर करीत दुसऱ्या दिवशी १४ पासून सविच बाजार समितीमधुन गायब असल्याची ओरड निविदा धारकांनी केली आहे. ते कामानिमित्य पुण्याला गेल्याचे सांगितले जात आहे. नियमाप्रमाणे सचिवांना निविदेत दिलेल्या तारखेपर्यंत कार्यालयातच उपस्थित राहणे सक्तीचे आहे. परंतु याला हरताळ फासत सचिवच कार्यालयातुन गायब असल्याने आता निविदा भरणार कशा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. २० ऑक्टोबर शेवटची तारीख असताना ते बाजार समितीला पोहोचले नाही त्यानंतर शासकीय सलग सुट्ट्या आल्यात तर २४ ऑक्टोंबर ही ऑनलाइनची अंतिम तारीख होती २४ तारखेला जेव्हा सचिवांना तक्रारकर त्यांनी फोन केला की आपली स्वाक्षरी आहे तर सचिवांनी स्पष्ट सांगितले की माझी सुट्टी असल्यामुळे मी येऊ शकत नाही, सचिव न आल्यास या निविदा प्रक्रियेपासून शेकडो निविदाधारक वंचित राहण्याची शक्यता आहे.त्यामुळे याबाबतची तक्रार शुभम मुंदे यांनी सहनिबंधक व बाजार समिती सभापतींना दिली आहे. याबाबत सचिव अमित मोहोड यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता ते नॉट रिचेबल होते.

निविदा मॅनेज करण्याचा हा प्रकार आहे. कोट्यावधीची जमिन गिळंकृत करण्याकरिता १३ ला निविदा काढून १४ पासून सचिव रजेवर गेले आहे. वास्तविकता त्यांना पाठविण्यात आले आहे. १३ ते २० ऑक्टोबर ही तारिख याच करिता घेतली आहे. यामध्ये ज्यांना ही जागा द्यायची आहे,त्यांनाच केवळ जिओ टॅगिंगवर स्वाक्षरी देण्यात आली आहे.इतरांना निविदा न मिळविण्याकरिता हा सर्व खटाटोप असल्याने तशी तक्रार सहकार विभागाला दिली आहे.

# दिवसा ऊन रात्री गारवा; बाजारपेठेतील खरेदीच्या गर्दीमुळे 'व्हायरल'चे दिवाळी गिफ्ट

## जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे नागरिकांना त्रास; संसर्गजन्य आजार वाढण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

पावसाळा संपताच राज्यात'ऑक्टोबर हिट'ने जोर धरला आहे. दिवसा तापमान वाढून कडक ऊन पडत आहे, तर रात्री गारठा तर कधी पाऊस पडतो आहे. दिवस-रात्र तापमानातील या तीव्र चढ-उतारांमुळे सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी अशा संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढले आहे. त्यातच दिवाळीच्या खरेदीनिमित्त बाजारपेठांत नागरिकांची प्रचंड गर्दी असल्याने एकमेकांना संसर्ग होण्याची शक्यता वाढली आहे. परिणामी, शहरातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

**दिवसा कडक ऊन, रात्री गारवा**




गेल्या आठवडाभरापासून शहरात दिवसा तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सिअसच्या दरम्यान तर रात्रीचे तापमान १८ ते २० अंशांवर घसरत आहे. या तापमानातील मोठ्या फरकामुळे शरीराला जुळवून घेण्यात अडचणी येत आहे.

**१५ दिवसांच्या हवानामाचा अंदाज**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील पंधरवडा दिवसा तापमानात आणखी वाढ होणार असून, रात्री गारवा कायम राहील. विशेषतः ग्रामीण भागात सकाळी दव आणि धुळे दिसेल, तर दुपारी तापमान ३५ अंशांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा ऊन-पावसाचा खेळ कायम राहणार आहे.

**मार्केटमध्ये जातानामास्क वापरा**

आरोग्य विभागाने नागरिकांना गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरण्याचे, वारंवार हात धुण्याचे आणि शरीरात पुरेसे पाणी ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच, आजाराची लक्षणे जाणवल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय तसेच खासगी रुग्णालयात सध्या सर्दी, खोकला, ताप व अंगदुखीची लक्षणे असलेल्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

# गोरगरीब गावकऱ्यान सोबत साजरी झाली पालावरची दिवाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**

तिवसा शहरामध्ये यंदाची दिवाळी आनंदात तसेच सामाजिक बांधिलकी जपत साजरी करण्यात आली. शहरातील युवक व महिलांनी मिळून आमदार राजेश वानखडे यांच्या सह गोरगरीब व गरजू कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करत एक अनोखा उपक्रम राबवला.



या उपक्रमांतर्गत गरजू व्यक्तींना नवे कपडे, मिठाई, फटाके आणि फराळाचे साहित्य देण्यात आले. गावातील बालकांना दिवे लावण्यासाठी आणि फटाके फोडण्यासाठी एकत्र आणण्यात आले. त्यामुळे दिवाळीचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसला.

आमदार राजेश वानखडे मित्र परिवार आयोजित या उपक्रमामुळे गावात ऐक्य, प्रेम आणि मानवतेचा सुंदर संदेश दिला गेला.ही दिवाळी केवळ आनंदाची नव्हे, तर समाजातील सर्वांना सोबत घेऊन साजरी केलेल्या माणुसकीची दिवाळी ठरली.दीपावलीच्या या पावन पर्वा वर दिव्यांच्या उजेडासोबतच मानवी संवेदनांचा प्रकाश झळकला आणि सर्वांनी एकमेकांना शुभ दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्याया प्रसंगी सौ आरतीताई वानखडे, सौ छायाताई दांडाळे, नितीन गुडधे, प्रवीण अळसपुरे, प्रदीप गौरखेडे, अजय गुल्हाणे, विनोद पटेल, सुधीर गोडसे, अनिल थुल, प्रकाश पडोळे, सुमित अनासणे, अंकुश देशमुख, भूषण मुंदाणे, ज्ञानेश्वर कुरवाडे, पंचांरीय सर, हेडा सर,अतुल देशमुख, अनिकेत वानखडे, सतीश नंदनवार, सुधीर वानखडे, आदी मंडळी उपस्थित होती.

अंबापेठ -गौरक्षण-नमुना प्रभाग तसेच शहरातील समस्त नागरिकांना तसेच शेतकरी बंधू-भगिनींना दीपावलीच्या मन:पूर्वक

हार्दिक शुभेच्छा

हि दीपावली तसेच नववर्ष आपणास आनंदी सुख-समृद्धी, प्रगतीचे, आरोग्यदायी व भरभराटीचे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना



मिलिंद बांबल
(भाजपा अध्यक्ष किसान मोर्चा तसेच माजी नगरसेवक)



सौ. विजया मिलिंद बांबल
(माजी नगरसेविका मनपा अमरावती)





# भेसळयुक्त मिठाईने पैसे तर जाणार पोटही बिघडणार; वेळीच करा एफडीएकडे तक्रार

## दूषित अन्न नमुने घेऊन होते तपासणी अहवालात दोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळीत मोठ्या प्रमाणात मिठाया, फराळ आदी खाद्यपदार्थाची विक्री होते. याचा गैरफायदा घेत बाजारात बनावट व भेसळयुक्त पदार्थ विकल्या जाण्याची शक्यता असते. शिवाय मिठाई विक्रेते भेसळयुक्त निकृष्ट व शिळ्या पदार्थांची विक्री करतात. भेसळयुक्त पदार्थामुळे सणासुदीचा विचका होऊन प्रकृतीलाही अपाय होतो. परिणामी आरोग्याविषयक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे



खाद्यपदार्थ खरेदी करताना ग्राहक, विक्रेत्यांनीही काळजी घेणे आवश्यक झाले आहे, कुठेही अशा पदार्थांची विक्री होत असल्यास अन्न व औषध प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**खरेदी करण्याआधी या गोष्टी नक्की तपासा**

हॉटेल, बेकरी, स्वीटमार्टमधील ट्रेमध्ये ठेवण्यात आलेल्या खाद्यपदार्थांची विक्री करताना बेस्ट बिफोर लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. खाद्यपदार्थ खरेदी करताना पदार्थांच्या शुद्धतेची काल मर्यादा तपासावी मिठाईचे सेवन २४ तासांच्या आत करावे, विक्रेत्याकडून बिल घ्यावे.एफडीएकडून विविध खाद्यपदार्थ निर्मिती, विक्रेते, दुकानांची तपासणी करण्यात येत आहे.